पाक्षिक
# मनोगत
प्रदेश बीजेपी




विकसित महाराष्ट्रासाठी क्रियाशील व्हावे

मुंबई • वर्ष: 8 • अंक: 17 • 1 सप्टेंबर 2026 • पृष्ठसंख्या: 36 • किंमत: 5 रू.






# माओवाद्यांचा डाव ओळखा

सौजन्य: क्विंट.कॉम



## अध्यक्षीय मनोगत

# कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारी बैठक

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश पदाधिकाऱ्यांची आणि राज्य कार्यकारिणीची बैठक नुकतीच पुणे येथे झाली. दिल्लीत राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची २२ ऑगस्ट रोजी बैठक झाली. या बैठकीनंतर लगेचच राज्य पदाधिकारी आणि कार्यकारिणीची बैठक करण्याचा प्रघात आहे. त्यानुसार ३१ ऑगस्ट रोजी पुण्यात या दोन्ही बैठका घेण्याचे ठरविण्यात आले. पुणे शाखेने मोठ्या उत्साहाने या बैठकांचे यजमानपद स्वीकारले. अवघ्या ८-९ दिवसांत या बैठकांची तयारी करणे हे मोठे आव्हान होते. पुण्यातील सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी हे आव्हान यशस्वीपणे पेलले. बैठकीसाठी राज्यभरातून येणाऱ्या कार्यकर्त्यांची अत्यंत आपुलकीने व्यवस्था करत पुणे शाखेने ही बैठक पार पाडली, याबद्दल केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, पुणे जिल्हाध्यक्ष धीरज घाटे, महापौर मंजुषा नागपुरे यांचे तसेच ही बैठक यशस्वी करण्यासाठी झटणाऱ्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. पुणे शाखेने येणाऱ्या प्रतिनिधींची गैरसोय होणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली. या बैठका प्रदेश पदाधिकारी आणि राज्यभरातील कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा देणाऱ्या ठरल्या. या बैठकांमधून कार्यकर्त्यांना विरोधकांच्या अपप्रचाराचा कसा सामना करावा, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारबद्दल खोटे-नाटे पसरविण्यासाठी विरोधकांनी आपली कार्यपद्धती कशी बदललेली आहे, याचे विस्तृत विश्लेषण आपल्या सर्वांचे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत केले. विरोधकांची बदललेली कार्यपद्धती ओळखून त्याला कोणत्या पद्धतीने उत्तर द्यायचे याचा कानमंत्रही देवेंद्रजींनी कार्यकर्त्यांना दिला. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी पुण्यातच आपल्या पक्षाचे खुले अधिवेशन झाले होते. आपले नेते व केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह हे या अधिवेशनाला उपस्थित होते. त्या अधिवेशनात देवेंद्रजींनी कार्यकर्त्यांना आक्रमक होऊन विरोधकांना जशास तसे उत्तर देण्याचा आदेश दिला होता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आपली कामगिरी अपेक्षेनुसार झाली नव्हती. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये काहीशी नैराश्याची भावना होती. कार्यकर्त्यांच्या मनातील मरगळ झटकून टाकणारे भाषण देवेंद्रजींनी त्या अधिवेशनात केले होते. त्या अधिवेशनामुळे राज्यभरातील कार्यकर्ते नव्या आत्मविश्वासाने विधानसभा निवडणुकीत उतरले. त्याचा परिणाम आपल्याला ऐतिहासिक यश मिळण्यात झाला. यावेळची कार्यकारिणी बैठक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नव्हती. तरीही कार्यकर्ते प्रचंड उत्साहाने या बैठकीत सहभागी झाले होते. गेल्या २ महिन्यांतील घडामोडींतून मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टीला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनाम करण्यासाठीचे काही शक्तींचे प्रयत्न उघडे पडले. विरोधक आपल्या परीने वेगवेगळ्या पद्धतीने विविध माध्यमातून जनतेमध्ये संविधानाने निर्माण केलेल्या व्यवस्थेविरोधात अविश्वास, असंतोष पसरवण्याचे उद्योग करीत आहेत. विरोधकांच्या या उद्योगांना प्रभावीपणे उत्तर देण्यासाठी या बैठकीमधून कार्यकर्त्यांना नवी ताकद मिळाली आहे. आपल्या सरकारची कामे जनतेपर्यंत पोहचवण्याबरोबरच युवा पिढीला नशेपासून वाचवण्यासाठी अभियान हाती घेण्याचा संदेश या बैठकांमधून कार्यकर्त्यांना मिळाला आहे. बैठकीच्या यशस्वी आयोजनाबद्दल पुण्यातील कार्यकर्त्यांना पुनश्च धन्यवाद!

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश नामदेव हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

माओवाद्यांचा डाव ओळखा ०४


विकसित महाराष्ट्रासाठी प्रत्येक भाजपा कार्यकर्त्याने क्रियाशील व्हावे ०९


दिमागी नक्षलींचे कुळ आणि मूळ १२


'लाल' नव्हे विकास कॉरिडॉर १५


गडचिरोली बनते आहे 'विकास पंढरी' १८


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान मोठे की काँग्रेस? २०


हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद नारायण कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश नामदेव हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# माओवाद्यांचा डाव ओळखा



● **देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

> पुणे येथे नुकत्याच झालेल्या प्रदेश कार्यकारिणी बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संपादित अंश...

**हिंदवी** स्वराज्याचे सरसंस्थापक छत्रपती शिवरायांना मानाचा मुजरा करतो. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना अर्पित करतो. आज महत्त्वाचा दिवस आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला जरी आपण स्वतंत्र झालो, तरीही इंग्रजांनी या देशातल्या अनेक भटक्या-विमुक्त जमातींना स्वातंत्र्य लढ्यामध्ये त्यांनी योगदान दिले म्हणून त्यांना नेस्तनाबूत करण्याकरता 'क्रिमिनल ट्राइब्स' अशा पद्धतीने आमच्या अनेक भटक्या-विमुक्त जमातींना गुन्हेगार ठरवले होते आणि त्यांच्यावर कारवाई केली होती. आजच्याच दिवशी, ३१ ऑगस्ट १९५२ रोजी या देशात कायदा आला आणि इंग्रजांनी आमच्या भटक्या-विमुक्तांवर मारलेला गुन्हेगारीचा शिक्का स्वतंत्र भारताच्या कायद्याने मिटवला. आणि म्हणून आजचा दिवस हा भटके-विमुक्त दिवस म्हणूनदेखील आपण साजरा करतो. भटक्या-विमुक्त समाजातील नाम-अनाम स्वातंत्र्य संग्राम सेनानी, ज्यांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले, त्यांना देखील आज मी अभिवादन करतो.

आज तिसरा श्रावण सोमवार देखील आहे. आपल्याला प्रत्येकाला माहिती आहे की, छत्रपती शिवरायांनी आपल्याला लढायला शिकवले आणि छत्रपती शिवरायांची सेना मैदानात उतरली की एकच नारा द्यायची- हर हर महादेव! चढाई करताना हाच नारा छत्रपती शिवरायांची सेना प्रत्येक वेळी द्यायची. आता तशाच प्रकारची चढाई करण्याची वेळ पुन्हा एकदा येते आहे. आपल्यावर आक्रमण नवीन नाही, आक्रमण करणारे नवीन नाहीत, विषय पण नवीन नाही. पण यांनी कार्यपद्धती बदललेली आहे. ही

## तरुणांना पुढे करून माओवादी काँग्रेससाठी लढत आहेत

अनेक प्रयत्न करूनही भाजपा पराभूत होत नसल्याने विरोधकांनी आपली कार्यपद्धती बदलली आहे. माओवाद्यांचा हा नवा डाव कार्यकर्त्यांनी समजून घेतला पाहिजे. काँग्रेससारख्या पक्षांना माहिती आहे, त्यांच्याकडे मोठे ओझे आहे. ते आपल्याशी लढू शकत नाहीत. कारण ज्या क्षणी ते आपल्याला प्रश्न विचारतात, एक बोट आपल्याकडे आणि चार बोटे त्यांच्याकडे येतात आणि त्यांनाही जनता प्रश्न विचारते, 'तुम्ही काय केले ते सांगा.' आणि मग मोदीजींच्या १२ वर्षांसमोर त्यांचा...५० वर्षांचा कारभार इतका खुजा दिसतो. त्यांच्या राज्यांमध्ये होणारे भ्रष्टाचार, त्यांच्या राज्यांमध्ये होणारे पेपर लीक, या सगळ्या गोष्टींची उत्तरे त्या ठिकाणी त्यांना देता येत नाहीत. आणि म्हणून जसे लोकसभेपूर्वी एक त्यांनी नरेटिव्ह तयार केला होता, भारत जोडो लक्षात असेल. लोकसभेचा नरेटिव्ह काँग्रेसचा नव्हता. १८० संस्था होत्या, वेगवेगळ्या 'एनजीओ' होत्या. मी विधानसभेमध्ये पुराव्यासहित दाखवले. या १८० पैकी अनेक संस्था अशा होत्या की ज्या संस्थांना यूपीएच्या सरकारने अर्बन नक्षल म्हणून लोकसभेच्या पटलावर सांगितले होते. अशा १८० संस्था एकत्रित आणून भारतीय जनता पक्षाच्या विरुद्ध नरेटिव्ह त्यांनी तयार केला. कारण त्यांना माहिती आहे, अशा प्रकारच्या संस्थांना बॅगेज नसते, कारण त्यांना अकाउंटेबिलिटी नसते, कारण त्यांना निवडणूक लढायची नसते. त्यामुळे त्यांना विचारू शकत नाही, तुम्ही काय केले, तुम्ही काय करणार, हे त्यांना विचारता येत नाही. त्यांनी रोज खोटे बोलायचे, त्यांनी रोज आरोप करायचे, त्यांनी रोज रिकामा ग्लास दाखवायचा आणि आपण त्याची उत्तरे देत राहायची. अशा प्रकारचा हा नरेटिव्ह आहे.



कार्यपद्धती आता आपल्याला समजून घेण्याची आवश्यकता आहे. जेव्हा शत्रूंनी वेगवेगळ्या पद्धतीने स्वराज्यावर हल्ले केले, त्यावेळी छत्रपती शिवरायांनी देखील गनिमी काव्यापासून गुप्तहेरांपर्यंत अनेक पद्धतींनी नावीन्य आणून त्या शत्रूंचा नायनाट केला होता. आज आमचे विरोधक – मी शत्रू म्हणणार नाही– आमचे विरोधक एका नवीन कार्यपद्धतीचा अवलंब करताहेत आणि ती आपल्याला समजून घ्यावी लागेल. कारण माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात या भारताची जी घोडदौड चाललेली आहे, जगातली सर्वात मोठी चौथी अर्थव्यवस्था म्हणून भारत पुढे आला आहे. आत्मनिर्भर भारताच्या दिशेने आपली वाटचाल सुरु आहे.

आता भारताला शस्त्रास्त्रांकरता कोणावर अवलंबून राहावे लागत नाही, उत्पादनासाठी अवलंबून राहावं लागत नाही. आपले अवलंबित्व पेट्रोल–डिझेल पुरते मर्यादित आहे. पण मला विश्वास आहे, मोदीजींच्या नेतृत्वात २०३० पर्यंत देशाची पेट्रोल–डिझेलची ५० टक्के गरज भारतातील शेतकरी भागवेल आणि उरलेली गरज 'ईव्ही' च्या माध्यमातून भागवली जाईल.

आत्मनिर्भरतेकडे जाणारा भारत तुम्हाला आणि आम्हाला आवडत असेल, पण जगामध्ये अशा खूप शक्ती आहेत की ज्या शक्तींना तो चालत नाही, आवडत नाही, पाहवत नाही. त्या शक्तींना माहिती आहे, या भारताला याच ठिकाणी जर रोखले




नाही, तर या भारताला पुढे रोखता येणार नाही. आणि म्हणून त्यांनी देखील कार्यपद्धती बदलल्या आहेत. आज ते ज्यांचा उपयोग करताहेत, त्यांच्यापैकी कदाचित पाच टक्केच लोकांना माहिती आहे की आपला उपयोग करून घेतला जात आहे . काही जण जाणीवपूर्वक अशा शक्तींना साथ देताहेत. पण ९५ टक्के लोकांना माहितीच नाही की आपला उपयोग देशविरोधी कारवायांसाठी करून घेतला जात आहे. अजाणतेपणे अनेक लोक हे अशा शक्तींच्या सोबत जाताहेत. म्हणून कार्यकर्ता बंधू-भगिनींनो, कार्यपद्धतीत झालेला बदल आपणही समजून घ्यावा लागेल. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अंतिम भाषणामध्ये अराजकतेचे व्याकरण (Grammar of Anarchy) आपल्याला समजावून सांगितले, आज तेच अराजकतेचे व्याकरण, त्याच संविधानाचे नाव घेऊन आपल्या विरोधात वापरण्याचा प्रयत्न होत आहे. अनेकांना वाटत असेल की, केवळ भाजपाच्या विरोधात याचा वापर केला जातो आहे. हे भाजपच्या विरोधात नाही; बृहद् समाजाच्या विरोधात याचा वापर चाललेला आहे. संविधानाचे नाव घ्यायचे आणि संविधानाची मूल्ये पायदळी तुडवून अराजकतेचे व्याकरण मांडण्याचे काम चालले आहे.

पण मला विश्वास आहे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे संविधान आपल्याला दिले आहे की, कोणी जर त्याचा दुरुपयोग करण्याचा प्रयत्न केला, तर त्याचे हात जळल्याशिवाय राहणार नाहीत, असा मला विश्वास आहे. म्हणून म्हणतो ही लढाई वेगळ्या पद्धतीची लढाई आहे. ज्यांनी संविधानाची सर्वाधिक मोडतोड केली, ज्यांनी १९७५ मध्ये बाबासाहेबांना सर्वांत प्रिय असलेले संविधानातले मूलभूत अधिकार संविधान दुरुस्ती करून संपवले, त्या विरोधात न्यायालयातही जाता येणार नाही, अशी दुरुस्ती संविधानात करून नागरिकांचे मूलभूत अधिकार संपवून टाकले, तोच काँग्रेस पक्ष आता हातात लाल संविधान घेऊन सरकार आणि सरकारी यंत्रणेविरुद्ध अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. बंधू-भगिनींनो, हे लाल संविधान त्यांच्या हातात जे आहे ना, ते वरकरणी संविधानाचे आहे; पण आतमध्ये माओवादाचे लाल पुस्तक आहे. त्या लाल पुस्तकाच्या आधारावर यांच्या कारवाया चालू आहेत. म्हणून 'छात्रों की गूंज' राहुल गांधींना आठवायला लागली. ही 'छात्रों की गूंज' नाही, ही 'झूठ की गूंज' आहे. 'झूठ की गूंज' म्हणजे खोट्याचे नाटक चाललेले आहे. अशा कार्यक्रमांत आमच्या मुलींना सांगितले जाते की, तुमच्या परिवाराच्या

विरोधात बंड करा. त्यांना सांगितले जाते, भारत देश हा पितृसत्ताक आहे, येथे महिलांना जागा नाही. अनेक खोट्या गोष्टी अशा ठिकाणी सांगितल्या जातात. पण ही जी पिढी आहे ना, कोणी त्याला 'जेन झी' म्हणते, मी त्याला 'जेन झी' म्हणत नाही, मी यांना युवाशक्ती मानतो. ही युवाशक्ती फार हुशार आहे. राहुल गांधींच्या भाषणानंतर कर्नाटकमध्ये त्यांनी 'छात्रों की गूंज' येथे भाषण केले आणि एक युवा मुलगी जी त्या कार्यक्रमात हजर होती, ती लगेच घरी गेली आणि तिने तथ्य पडताळणी केली. आणि राहुल गांधींनी मांडलेल्या ४० मुद्यांपैकी २९ मुद्दे हे कसे खोटे आहेत, या संदर्भात तिने लगेच एक संकेतस्थळ तयार केले. त्याला 'झूठ की गूंज' नाव दिले आणि त्या संकेतस्थळावर पुराव्यांसहित टाकले. आता मुलींसाठी, महिलांसाठी बोलणाऱ्या राहुल गांधींच्या सरकारने काय करावे? तिने तथ्य पडताळणी करून राहुल गांधी काय खोटे बोलले आहेत, हे जसे संकेतस्थळावर टाकले, कर्नाटक सरकारने तिच्याविरुद्ध एफआयआर दाखल केला. म्हणजे यांची नियत बघा.

आज खऱ्या अर्थाने मातृसत्तेचे प्रतीक काय आहे? या देशामध्ये मातृसत्तेचे सर्वात मोठे प्रतीक काही असेल, तर ते 'वंदे मातरम्' गीत आहे. 'वंदे मातरम्'पेक्षा मातृसत्ताक पद्धतीचे दुसरे कुठले प्रतीक नाही. 'त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी' हे सुरू झाल्याबरोबर सोनियाजींनी थयथयाट चालू केला आणि काँग्रेसच्या कार्यालयामध्ये 'वंदे मातरम्' गीत थांबायला लावले. आपण सगळ्यांनी बघितले. अरे, तेच 'वंदे मातरम्' गीत आहे, हे गीत गात गात अनेक स्वातंत्र्य सेनानी फाशीवर गेले. गळ्यात फास होता, तरीदेखील घाबरले नाहीत. 'वंदे मातरम्' म्हणत राहिले. पण या देशाला पितृसत्ताक म्हणणाऱ्यांना ज्या क्षणी आम्ही 'त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी, कमला कमलदल विहारिणी' म्हणतो, त्या क्षणी यांना काटे टोचतात आणि बंधू-भगिनींनो, आमच्या चित्राताईंनी खरा प्रश्न विचारला आणि तो प्रश्न हाच आहे. काँग्रेस पक्षाला आणि राहुल गांधींना. तुमच्या पक्षात महिलांना संधी देण्याची वेळ होती, तर प्रियंकाजींना संधी तुम्ही का दिली नाही? हे राहुल गांधी आणि त्यांच्या मातोश्रींना देखील सांगावे लागेल. एकीकडे महिलांबद्दल बोलायचे आणि दुसरीकडे आपल्या सगळ्यांना माहिती आहे, ज्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने राजीव गांधींच्या काळामध्ये मुस्लिम महिलांना पोटगीचा अधिकार दिला आहे, त्यांना अशा पद्धतीने तलाक देता येणार नाही, हा निर्णय बदलण्यासाठी संसदेमध्ये कायदा आणून सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय बदलवण्याचे काम याच काँग्रेस पार्टीने केले होते. त्यावेळी महिला कुठे होत्या? त्यावेळी मातृसत्ता कुठे होती?

आमच्या लाडक्या बहिणी असतील, आमचे शेतकरी

## युवा मोर्चाने तरुणांशी संवाद साधावा

**माझे युवा मोर्चाला आवाहन आहे. आपल्या लक्षात असेल, २०२२ मध्ये आपण युवा वॉरियर अभियान सुरू केले होते. काही कारणांनी ते मागे पडले. पण आता आमचा जो युवा मोर्चा आहे, त्याला माझे सांगणे आहे. या महाराष्ट्रामध्ये १८ वर्षांपासून २६ वर्षांपर्यंत या वयाचे युवा आणि युवती दोन कोटी आहेत. २ कोटी लोक १८ ते २६ या वयोगटात आहेत. त्यामुळे आता युवा मोर्चाला मी टास्क देतोय. आमच्याकडे हे जे दोन कोटी आमचे तरुण आहेत, यापैकी किमान १० लाख तरुण-तरुणी भारतीय जनता युवा मोर्चाचे युवा वॉरियर्स असले पाहिजेत. आणि हे शक्य आहे. तुम्हाला मी एक गोष्ट सांगतो, समाजामध्ये खाली जा. समाजामध्ये राष्ट्रीय विचारांनी प्रेरित असलेल्या युवांची संख्या जास्त आहे. तुम्ही बघा, जो राष्ट्रीय विचाराने प्रेरित आहे, तो कमी बोलतो; पण त्याची संख्या कमी नाही आहे. त्या युवांपर्यंत पोहोचून त्यांना ज्यावेळी आपल्या संवादाचे माध्यम आपण बनवू, ज्यावेळी त्यांच्या माध्यमातून आपला संवाद सुरू होईल, त्यावेळी हा फेक नरेटिव्ह आपण पुन्हा एकदा तोडल्याशिवाय राहणार नाही. हा याकरता आवश्यक आहे की आपण बघितले, समाजमाध्यमेही अल्गोरिदमचे राजकारण करताहेत. समाजमाध्यमांमध्येही जिओ-पॉलिटिकल परिस्थितीचे प्रतिबिंब आपल्याला पाहायला मिळतेय. त्यामुळे लढाई केवळ चार माणसांची, दोन पक्षांशी नाही. या लढाईमध्ये अनेक अशा शक्ती आहेत की ज्यांना यांना असे वाटते, हस्ते-परहस्ते मोदीजींना कमजोर केले तरच हा देश कमजोर होऊ शकतो आणि म्हणून अनेक लोक त्याला हातभार लावताहेत.**

## दिमागी नक्षलींकडून युवा पिढीला भ्रमित करण्याचे प्रयत्न

**विरोधकांची नवीन कार्यपद्धती माहिती करून घ्या. आमच्या युवांना संविधानाचे नाव घेऊन संविधानाच्या विरोधात उभे करायचे, असा खेळ सुरु आहे. यांचे मनसुबे समजून घ्या. संविधानाने तयार केलेली प्रत्येक संस्था खराब आहे म्हणून सांगायची. पहिल्यांदा सांगायचे, संविधानाने तयार केलेले इलेक्शन कमिशन खराब आहे, न्यायव्यवस्था खराब आहे, रिझर्व्ह बँक खराब आहे, सीएजी खराब आहे. ही सुरुवात आहे. एक दिवस हे लोक सांगणार, बघा, या संविधानाने तयार केलेल्या या सगळ्या संस्था कुचकामी आहेत. याचाच अर्थ हे संविधान आपल्याला न्याय देऊ शकणार नाही आणि म्हणून आता नवीन व्यवस्था आपल्याला केली पाहिजे, अशा पद्धतीने हे लोक फेक नरेटिव्हच्या माध्यमातून संविधानविरोधी ताकद उभी करताहेत. तुम्ही बघा, दोन दिवसांत यांच्याबद्दल जे बोललो तेवढीच रील कापतील आणि त्या ठिकाणी आणतील, संविधान कुचकामी आहे, अशा प्रकारची नालायक प्रवृत्ती यांची आहे. पण लक्षात ठेवा, यांनी कितीही या संविधानाने तयार केलेल्या संस्थांच्या विरुद्ध एल्गार पुकारला तरीही तुमची शक्ती जिंकू शकत नाही. अरे, तुम्ही जिथे बंदुका घेऊन होतात, तिथे तुम्हाला आम्ही पराभूत केले आहे. आता तुम्ही या दुसऱ्या लढाईमध्ये आहात, ज्या लढाईला मोदीजींनी दिमागी नक्षल म्हटलेले आहे. हे दिमागी नक्षल आमच्या युवा पिढीला ग्रासित करण्याचा प्रयत्न करतायत. पण आपणदेखील राष्ट्रवाद हातामध्ये घेऊन आणि युवाशक्तीच्या कल्याणाकरता मैदानात उतरलो तर आपल्याला कोणी थांबवू शकत नाही. मित्रांनो, लढाई मोठी आहे. पण लढाई किती मोठी असली तरी शिवरायांनी शिकवलेय, देव, देश आणि धर्माकरता लढाईमध्ये उतरलात तर विजय आपलाच आहे.**

असतील, आमचे तरुण असतील, या सगळ्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन करण्याचं काम आपण करतोय. मगाशी संजू भाऊंनी सांगितले. संजू भाऊ, एक आकडेवारी थोडी चुकली. आता आपल्या लखपती दीदी ५० लाखांच्या घरात चालल्या आहेत आणि आपण एक कोटी बहिणींना लखपती दीदी या ठिकाणी करणार आहोत. आज इतक्या मोठ्या प्रमाणात इन्फ्रास्ट्रक्चरचे काम, ते सगळ्यांनी सांगितले. जगाच्या पाठीवर सर्वात मोठी जी पहिली दहा बंदरे आहेत, त्यात भारताचे एकही बंदर नाही. एकही नाही. पहिल्या ३० मध्ये देखील नाही. पण ज्या क्षणी वाढवण बंदर तयार होईल, जगातल्या पहिल्या दहा बंदरांमधले ते बंदर असणार आहे. एकट्या पालघर जिल्ह्यामध्ये १० लाखांचा रोजगार तयार होईल आणि महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला इतकी मोठी चालना या एका बंदरामुळे मिळेल. गेले ३० वर्ष जेएनपीटी बंदरामुळे महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. 'जेएनपीटी'पेक्षा तीन पट मोठे बंदर झाल्यानंतर या महाराष्ट्रात किती रोजगारनिर्मिती होईल, याचा विचार तुम्ही करू शकता. २०१४ मध्ये महाआघाडीच्या सरकारने ज्या मिसिंग लिंकच्यासंदर्भात १४ कारणे देऊन फाईल क्लोज केली आणि सांगितले, ही मिसिंग लिंक होऊ शकत नाही. आम्ही म्हटले, जे होऊ शकत नाही ते करण्याकरताच आमचा जन्म झालेला आहे आणि ती मिसिंग लिंक आम्ही करून दाखवली. आज तुम्हाला मी सांगतो, आता औद्योगिकीकरण हे केवळ मुंबई-पुण्यापुरते मर्यादित नाही. आज नाशिक असेल, छत्रपती संभाजीनगर असेल, धुळे असेल, आपले अहिल्यानगर असेल, अमरावती असेल, नागपूर असेल, गडचिरोली असेल. नवनवीन उद्योगाचे मॅग्नेट आपण तयार करतोय आणि या माध्यमातून डिसेंट्रलाईज पद्धतीने ही उद्योगाची इकोसिस्टीम आपल्याकडे तयार होते आहे.

मला विश्वास आहे, या संपूर्ण भारतीय जनता पक्षाच्या परिवाराच्या भरोशावर २०४७ चा विकसित महाराष्ट्र, विकसित भारत तर आपण घडवूच. पण त्याच्या आधीच २०३० मध्ये या महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करून या महाराष्ट्रातल्या प्रत्येक व्यक्तीची स्वप्ने पूर्ण करण्याचे काम हे आपण करून दाखवू.

महायुतीचे आपले सरकार, आपले दोन्ही मित्र, आपले काही छोटे मित्र, एकत्रितपणे या संकटांना सामोरे जाऊन या ठिकाणी परिवर्तन घडो, हा विश्वास व्यक्त करतो आणि माझे बोलणे संपवतो.

**जय हिंद, जय महाराष्ट्र**




# विकसित महाराष्ट्रासाठी प्रत्येक भाजपा कार्यकर्त्याने क्रियाशील व्हावे

● रविंद्र चव्हाण, प्रदेश अध्यक्ष

> पुणे येथे नुकत्याच झालेल्या प्रदेश कार्यकारिणी बैठकीत प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संपादित अंश...

**आज** सकाळी प्रथमतः महाराष्ट्र प्रदेशाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीला आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी आणि कोअर टीममधील सर्व नेते मंडळी उपस्थित होते. त्यात झालेल्या चर्चेनुसार आगामी सात दिवसांमध्ये ८० जिल्ह्याच्या कार्यकारिणी आपल्याला पूर्ण करायच्या आहेत. त्यापाठोपाठ मंडलाच्या कार्यकारिणीही पूर्ण करायच्यात. कारण नंतर गणेशोत्सव येत आहे. त्यामुळे संघटना रचनेतील सर्वच्या सर्व कार्यकारण्या पूर्ण होणे हे अपेक्षित आहे. आपले ७ मोर्चे, ४३ प्रकोष्ठ एवढा मोठा आपला भाजप परिवार आणि हा परिवार म्हणून आपल्याला एकत्रपणे ग्राऊंड लेवलवर जाऊन काम करायला हवे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी युवाशक्ती नशेच्या विळख्यात सापडल्याबद्दल चिंता व्यक्त करत आहेत. आगामी काळामध्ये देशातील युवाशक्ती ही नशामुक्त असली पाहिजे यासाठी आपण प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. देवेंद्रजींनी महाराष्ट्रामध्ये त्यासंदर्भामध्ये वेगवेगळ्या कॉलेज कॅम्पसमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना याबद्दल जागरूक करण्यासाठी कार्यक्रम घ्यायला सुरुवात केली आहे. परंतु एवढ्यावर आपण थांबून चालणार नाही. नशामुक्तीसाठी नेते मंडळी काम करतील, सरकार सरकारचे काम करत असेल परंतु आपल्या बूथवरच्या कार्यकर्त्यांनी वाडी वस्तीमध्ये जे कोणी अशा नशेच्या वस्तू जे विकत आहेत, जे या सगळ्याला कारणीभूत आहेत अशांची माहिती स्थानिक पोलीस आणि प्रशासनाला तातडीने कळविली पाहिजे. नशा करणारा व्यक्ती हा कुठे जाऊन हे सगळे मिळवत आहे याचा मागोवा काढून तो सरकारपर्यंत नेणे आणि संबंधितांवर कारवाई करण्यासाठी बूथ पातळीवरच्या

कार्यकर्त्यांनी सक्रिय झाले पाहिजे. तरच सगळ्या गोष्टीवरती कुठेतरी कंट्रोल येऊ शकतो. आशिषजी शेलार यांनी राजकीय ठराव मांडला. या ठरावाच्या माध्यमातून महाराष्ट्रातली परिस्थिती त्यांनी मांडली. या ठरावाला आदिवासी विभागाचे मंत्री उईके साहेबांनी अनुमोदन दिले. जनजाती समाजामध्ये केंद्रातील सरकार मोठ्या प्रमाणामध्ये कशा पद्धतीने काम करीत आहे आणि राज्यातील सरकार त्यामध्ये कसे पूरक काम करीत आहे हे उईके साहेबांनी मांडले. शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या बाबतीमध्ये केंद्रातील आणि राज्यातले सरकार कसे सतर्कपणे काम करत आहे, याची विस्तृत माहिती अनुमोदनामध्ये रणधीरजी सावरकर यांनी दिली. शेतकऱ्यांसाठीची अहिल्याबाई होळकर कर्जमुक्ती योजनेची माहिती त्यांनी सखोलपणे दिली. दुसरा प्रस्ताव डॉ. संजयजी कुटे यांनी दिला. युवा आणि युवाशक्तीच्या संदर्भामध्ये केंद्र आणि राज्य सरकार विविध योजनांच्या माध्यमातून कसे पाठबळ उभे करण्याचे काम करीत आहे, हे त्यांनी मांडले. चित्राताईंनी संवेदनशील पंतप्रधान म्हणून मोदीजींनी छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये कशा पद्धतीने माता-भगिनींसाठी विचार केला याची अतिशय सखोल मांडणी केली. आमची सर्वांची ताई, शिवानीताई हिने केंद्र आणि राज्य सरकार कशा पद्धतीने विद्यार्थी आणि तरुणांच्या पाठीशी उभे राहत आहे, हे कथन करताना सरकारच्या योजनांची माहिती दिली. मोदीजींच्या १२ वर्षाच्या कालावधीमध्ये आणि देवेंद्रजींच्या सरकारने सुरु केलेल्या सर्व योजनांचा नामोल्लेख करणे शक्य नाही. ज्या गोष्टी राहिल्या असतील त्या आपण पुन्हा सुचवाव्यात, प्रस्तावामध्ये त्याची पुन्हा दखल घेतली जाईल. प्रत्येक कार्यकर्त्याने विकसित महाराष्ट्राचा संकल्प साकार करण्यासाठी सक्रिय योगदान दिले पाहिजे, असे मी आग्रहपूर्वक सांगू इच्छितो.

या सगळ्या गोष्टींनंतर आगामी कार्यक्रम. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या राजकीय कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आपण १७ सप्टेंबर त्यांच्या जन्म दिवसापासून सेवा संकल्प अभियान आपण सुरू करत आहोत. १७ ऑक्टोबरपर्यंत हे अभियान होणार आहे. या संदर्भातली पूर्ण माहिती आपल्याला वेगवेगळ्या पद्धतीने दिली जाणार आहे. आगामी कार्यक्रम यशस्वी करणे ही सुद्धा आपल्या सर्वांची जबाबदारी आहे हेही आपण सर्वांनी

## नशामुक्त महाराष्ट्राचा संकल्प करा

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मध्ये युवा पिढीला नशेपासून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार आपण सर्वांनी नशामुक्त महाराष्ट्राचा संकल्प करावयाचा आहे. बूथस्तरावरील कार्यकर्त्यांनी आपल्या परिसरातील अंमली पदार्थ विक्रेत्यांची माहिती जिल्हा प्रशासन आणि पोलिसांपर्यंत पोहचवली पाहिजे. त्याबरोबरच या अंमली पदार्थ विक्रेत्यांवर कारवाई करण्यासाठी पाठपुरावा केला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविद्यालयांमध्ये जाऊन युवा शक्तीला नशामुक्त करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. सरकार आपल्या पद्धतीने काम करत राहिल. मात्र संघटना या नात्याने आपण या प्रयत्नांना साथ देणे आवश्यक आहे.**

लक्षात घेतले पाहिजे. महानगरपालिका, नगरपालिकेची प्रशिक्षण शिबिर होणार आहेत. या शिबिरांना नगरसेवकांची उपस्थिती अनिवार्य आहे हे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. मतदार यादी पुनरीक्षण अभियानात (SIR) सुनील राणे यांनी सहसंयोजक म्हणून आणि किरीटजींनी संयोजक म्हणून अतिशय ताकतीने काम केल आहे. गेली दोन-तीन महिने भारतीय जनता पार्टीचा बूथ पातळीवरचा प्रत्येक कार्यकर्ता बीएलए वन असेल, बीएलए टू असेल यांनी मेहनत घेतली आहे. त्यामुळे या अभियानात आपण अतिशय चांगल्या पद्धतीने काम केले आहे. SIR अभियानाचे दोन टप्पे पूर्ण झालेत. तिसऱ्या टप्प्यामध्ये कशा पद्धतीने काम करायच आहे या संदर्भातली ६, ७ आणि ८ नंबर फॉर्मची माहिती बैठकांमध्ये अनेकदा आपल्याला दिली आहे.

आपल्या कार्यशाळाही झालेल्या आहेत. परंतु आज पुन्हा यादी प्रसिद्ध झाली आहे. आपल्याला तातडीने या सगळ्या गोष्टीमध्ये उद्यापासून कामाला लागायचे आहे. आजच्या संपूर्ण कामकाजाचा संक्षिप्त वृत्तांत आपणापुढे ठेवण्याचा मी प्रयत्न केला आहे. आजच्या या बैठकीला आपण सगळेजण मोठ्या संख्येने अगदी कमी वेळेत सूचना देऊनही उपस्थित राहिलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे प्रदेशाच्यावतीने मी आभार मानतो. ■






पुणे– प्रदेश कार्यकारिणी बैठक– उपस्थिती– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, राष्ट्रीय उपाध्यक्षा डॉ.भारती पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, आदिवासी मंत्री अशोक उईके, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील–दानवे, प्रदेश सरचिटणीस आ. योगेश सागर, आ.माधवी नाईक, आ.संजय कुटे, आ. निरंजन डावखरे, सुनिल राणे, राजेश पांडे, महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष आ. चित्रा वाघ, मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, पुणे जिल्हाध्यक्ष धीरज घाटे, आ. योगेश टिळेकर आदी.

















# दिमागी नक्षलींचे कुळ आणि मूळ

जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (जेएनयु) निवेदिता मेनन नावाच्या एक प्राध्यापिका आहेत. ''काश्मीर हा भारताचा भाग नाही, भारताने काश्मीरवर अवैधरित्या कब्जा केला आहे,'' असे जाहीररीत्या विद्यार्थ्यांना सांगणाऱ्या या बाई परवा जंतर-मंतर आंदोलनात होत्या. काश्मीरच्या स्वातंत्र्याच्या घोषणा योग्यच आहेत, असेही या प्राध्यापिका सांगत असतात. त्यामुळेच 'जेएनयू'मध्ये 'भारत तेरे तुकडे होंगे' यासारख्या घोषणा दिल्या जातात.

'**निवडणुकांतून** आपल्याला हवा तसा बदल घडवता येत नाही हे आता दिसले आहे म्हणून रस्त्यावर उतरून बदल घडवावा लागेल', असे सांगणारे योगेंद्र यादव हे महाशय सुद्धा जंतर–मंतर आंदोलनात आघाडीवर होते. काश्मीरला भारतापासून मुक्त करावे लागेल, असे म्हणणाऱ्या अरुंधती रॉय याही जंतर–मंतरवर होत्या. काश्मीरमध्ये लष्कराच्या बंदोबस्ताबद्दल सार्वमत घ्यावे, असे म्हणणारे प्रशांत भूषण हेही जंतर–मंतर आंदोलनाला पाठिंबा देण्यात पुढे होते. या मंडळींचा उद्देश स्पष्ट आहे, विविध समाज घटकांना सरकारविरोधात हिंसक चळवळ करण्यास प्रवृत्त करणे, यालाच दिमागी नक्षल म्हणतात.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्ताने लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात देशातील काही व्यक्ती, शक्ती नक्षली बुद्धीच्या आहेत (दिमागी नक्षली) असा उल्लेख केला. त्यामुळे अनेकांच्या अंगाचा तिळपापड होऊ लागला आहे. अरविंद केजरीवाल, पी. चिदंबरम



प्रा. निवेदिता मेनन यांच्यासारख्या विचारवंत म्हणवणाऱ्या काश्मीरला भारताचा भाग मानत नाहीत. यातून काश्मीर स्वातंत्र्याचा अस्तित्वात नसलेला मुद्दा वारंवार उपस्थित केला जातो.

यासारख्या नेत्यांनी आम्ही नक्षली आहोत आणि आम्हाला त्याचा अभिमान आहे, अशा अर्थाचा उल्लेख असणाऱ्या पोस्ट समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केल्या आहेत. याचाच अर्थ पंतप्रधानांनी केलेला उल्लेख या मंडळींना चांगलाच खुपला आहे. भारतात नक्षलवाद्यांचा उदय कसा झाला आणि त्यांनी केलेल्या हिंसाचारात हजारो निरपराध व्यक्तींचे बळी कसे गेले याची माहिती नव्या पिढीला नाही. म्हणनूच नक्षलावादामुळे देशाला किती मोठे नुकसान सहन करावे लागले आहे, याची माहिती सध्याच्या 'जेन झी'ला देणे आवश्यक आहे. सध्याच्या 'जेन झी'ला पाकिस्तानातून आलेल्या दहशतवाद्यांनी देशात २००४ ते २०१४ कसा धुमाकूळ घातला होता याचीही कल्पना नाही. अत्यंत सुरक्षित वातावरणात, प्रगत तंत्रज्ञानाच्या काळात सध्याची 'जेन झी' वाढली आहे. आपण कळते होण्याच्या अगोदर सोनिया आणि राहुल गांधींच्या राज्यात, देशात नक्षलावांद्याचे आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांचे राज्य होते, याची माहिती नसलेल्या 'जेन झी'ला नक्षलवादाचा थोडक्यात इतिहास कळलाच पाहिजे. नक्षलावादाचा उदय सरकारी यंत्रणेच्या अत्याचाराविरोधात आणि जमीनदार,






३७० वे कलम रद्द करून काश्मीरचा स्वतंत्र दर्जा संपुष्टात आणणाऱ्या मोदी सरकारच्या निर्णयाला कम्युनिस्ट पक्ष प्रखर विरोध करतात.

सावकार यांच्या दडपशाहीविरोधात झाला होता. नक्षलवाद्यांनी सरकारी यंत्रणा आणि प्रस्थापितांविरोधात सशस्त्र उठाव करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे पश्चिम बंगाल, ओडिशा, झारखंड, तेलंगणा, छत्तीसगड, महाराष्ट्र अशा अनेक राज्यांत सशस्त्र नक्षलवाद्यांनी निरपराध सामान्यांचे आणि पोलीस कर्मचाऱ्यांचे बळी घेतले. पोलीस, सरकारी कर्मचारी, जमीनदार अत्याचार करीत असतील तर त्याविरोधात दाद मागण्याचा कायदेशीर मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाने उपलब्ध करून दिला आहे. मात्र त्यावर नक्षलवाद्यांचा विश्वास नाही. २००४ ते २०१४ या काळात नक्षलवाद आणि दहशतवाद उच्चांकी स्तरावर पोहचला होता. मनमोहन सिंग सरकार असताना नक्षलवाद्यांच्या हिंसाचारात हजारो जण ठार झाले. छत्तीसगढमध्ये २५ मे २०१३ रोजी माओवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात आणि गोळीबारात ज्येष्ठ काँग्रेस नेते विद्याचरण शुक्ल यांच्यासह २७ जण ठार झाले. त्याआधी २०१० मध्ये छत्तीसगढमध्येच नक्षलवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात केंद्रीय सुरक्षा दलाचे ७६ जवान ठार झाले होते. अशा अनेक घटना त्याकाळात घडल्या. मात्र त्यावेळच्या मनमोहन सिंग सरकारने नक्षलवाद्यांच्या विरोधात कडक कारवाई केली नाही. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर नक्षलवाद्यांविरोधात कडक कारवाई सुरू झाली. त्यामुळे नक्षलवादी शक्तींनी जंगलातून पळ काढत शहरांना आपले लक्ष्य केले. विविध जाती-जमातींत अफवा, गैरसमज पसरवून दंगे घडविणे हे शहरी भागातील नक्षलवाद्यांचे उद्दिष्ट होते. २०१८ मध्ये भीमा-कोरेगाव येथे झालेला हिंसाचार आणि नवी मुंबईत पोलिसांवर झालेली दगडफेक, जाळपोळ ही शहरी नक्षलवाद्यांच्या कारवायांची मोठी उदाहरणे आहेत. नवी दिल्लीत शाहिनबाग आंदोलनावेळी अनेक दिवस रस्ते अडविण्यात आले. त्यानंतर दिल्लीत दंगल झाली, यात प्रमुख आरोपी होता आम आदमी पक्षाचा नगरसेवक ताहीर हुसेन. विद्यार्थी आंदोलनात पोलिसांनी संसदेवर मोर्चा काढण्यास परवानगी दिली नसताना मोर्चा काढला गेला, अनेक पोलिसांना मारहाण केली गेली, पोलिसांच्या अनेक वाहनांचे नुकसान केले गेले. पोलिसांनी आंदोलकांवर गोळीबार करावा असाच उद्देश दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनात घुसलेल्या नक्षलवादी शक्तींचा होता. दिल्लीतील आंदोलनात उतरलेल्या संघटनांपैकी एकही संघटना झारखंडमधील आंदोलनात सहभागी झाली नाही, हे लक्षात घ्या. मोदी सरकारविरुद्ध आंदोलन करून हिंसाचार व्हावा अशा पद्धतीने आंदोलने करणे हाच नक्षली शक्तींचा सध्याचा हेतू आहे. त्यामुळेच केजरीवाल, पी. चिदंबरम यांच्या सारख्यांना पंतप्रधान मोदीजींच्या वक्तव्यांमुळे मिरची लागली.

'होय, मी नक्षली आहे,' असे आज म्हणणारे पी. चिदंबरम केंद्रीय गृहमंत्री असताना शहरी नक्षलवाद हे देशापुढील सर्वात मोठे संकट असल्याचे म्हणत होते. चिदंबरम यांच्यानंतर केंद्रीय गृहमंत्री झालेले सुशिलकुमार शिंदे यांनीही शहरी नक्षलवादाचा धोका मोठा असल्याचे सांगितले होते. नोव्हेंबर २०१३ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करून शहरी नक्षलवादी देशापुढचे संकट असल्याचे नमूद केले होते. शहरी नक्षलवादी हे वेगवेगळ्या संघटनांच्या माध्यमातून काम करीत असून त्यांचा संबंध भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी (माओवादी) असल्याचे मनमोहन सिंग सरकारने शपथपत्रात म्हटले होते. मानवी हक्काच्या नावाखाली काम करणाऱ्या संघटना या प्रत्यक्षात




'जेएनयू'सारख्या विद्यापीठातून काश्मीरच्या स्वातंत्र्याच्या देशविरोधी मागण्या केल्या जातात.

शहरी नक्षलवाद्यांशी संबंधित असल्याचे त्या शपथपत्रात निदर्शनास आणले गेले होते. याबाबत पी. चिदंबरम यांनी केलेली वक्तव्ये आजही यूट्यूबवर उपलब्ध आहेत. केंद्रातील सत्तेत असताना ज्या नक्षलींना चिदंबरम हे देशापुढील संकट म्हणत होते ते चिदंबरम आज नक्षली असल्याचा मला अभिमान आहे, असे म्हणू लागले आहेत. यातून काँग्रेसचे संधीसाधू राजकारण उघडे पडले आहे. काँग्रेसच्या काळात नक्षलवाद्यांची दहशत प्रचंड वाढली होती. काँग्रेसच्या दुबळ्या धोरणांमुळेच देशात नक्षलवाद फोफावला, अशी टीका करणारा लेख ज्येष्ठ पत्रकार आणि इंडियन एक्स्प्रेसचे माजी संपादक शेखर गुप्ता यांनी ३ सप्टेंबर २०१८ रोजी 'द प्रिंट' या वृत्तपत्रात लिहला होता. हा लेखही इंटरनेटवर उपलब्ध आहे. नक्षलवाद्यांनी केंद्रीय हजारो सुरक्षादल जवानांच्या आणि हजारो पोलिसांच्या हत्या केल्या. हजारो युवकांची दिशाभूल करून त्यांना हिंसक नक्षलवादी बनवले. मोदी सरकारने गेल्या १२ वर्षात कठोर उपाययोजना करून नक्षलवाद्यांचा बिमोड केला आहे. जंगलात लपून बसलेले नक्षलवादी एकतर ठार झाले आहेत किंवा सरकारला शरण आले आहेत. मात्र अनेक बुद्धिवंत, विचारवंत म्हणवणारी मंडळी मोठ्या शहरांमध्ये विविध मार्गांनी नक्षलवादी तयार करत आहेत. त्यासाठी विविध जाती गटांची दिशाभूल केली जात आहे. वेगवेगळ्या समाजांमध्ये वैमनस्य निर्माण केले जात आहे.

महाराष्ट्रात कबीर कला मंच नावाची संघटना अनेक दिवस काम करत आहे. २०१३ मध्ये कबीर कला मंचाच्या काही कार्यकर्त्यांनी त्यावेळचे राज्याचे गृहमंत्री आर.आर. पाटील यांच्या समोर आत्मसमर्पण केले होते. त्यावेळी आर.आर.पाटलांनी नक्षली संघटना विरोधात कठोर भूमिका घेतली होती. याच कबीर कला मंचाच्या कार्यकर्त्यांना २०१८ झालेल्या भीमा-कोरेगाव येथील दंगलप्रकरणी अटक करण्यात आली होती. त्यावेळी आर. आर. पाटील म्हणाले होते की जंगलात दडून बसलेल्या नक्षलवाद्यांचे खरे सूत्रधार शहरातच आहेत. नक्षलवाद्यांना लागणारी सर्व रसद, पैसा आणि शस्त्रे शहरांमधूनच पुरवली जातात. पुण्यासारख्या शहरात नक्षलवाद्यांचा ट्रेनिंग कॅंप झाल्याचे आर. आर. पाटील यांनी विधानसभेत सांगितले होते. त्याबाबतचे पुरावे आर. आर. आबांनी विधानसभेत सादर केले होते. नक्षलवाद्यांच्या सूत्रधारांना पकडण्यासाठी कायदे कमी पडतात, अशी खंतही आर. आर आबांनी विधानसभेत बोलताना व्यक्त केली होती. आजवर नक्षलवाद्यांनी केलेला नरसंहार केजरीवाल आणि काँग्रेसच्या नेत्यांनी आठवून पहावा. त्या नरसंहाराला आपण केवळ नरेंद्र मोदी यांना विरोध करण्यासाठी पाठीशी घालत आहोत, याचीही जाणीव या नेत्यांना नाही. ■

# 'लाल' नव्हे विकास कॉरिडॉर

केंद्र सरकारने ३१ मार्च २०२६ रोजी देश नक्षलवादमुक्त झाल्याचे घोषित केले. अनेक दशकांपासून घातपात, सशस्त्र गट आणि माओवादी नियंत्रणाशी जोडल्या गेलेल्या प्रदेशासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. यामुळे केवळ एका बंडखोरीच्या लष्करी पराभवापेक्षाही मोठा प्रश्न निर्माण होतो: 'रेड कॉरिडॉर'ची जागा कोण घेणार? या प्रश्नाचे उत्तरच सरकारच्या या कामगिरीचा टिकाऊपणा ठरवेल.




**गृहमंत्री** अमित शाह यांच्या डाव्या विचारसरणीच्या अतिरेक्यांसंदर्भातील दृष्टिकोनामध्ये गुप्तचर यंत्रणेच्या नेतृत्वाखालील कारवाया, केंद्र आणि राज्य दलांमध्ये अधिक समन्वय, माओवाद्यांच्या आर्थिक पुरवठ्यात व्यत्यय, पुनर्वसन आणि सुरक्षा व्यवस्थेचा सातत्यपूर्ण विस्तार यांचा समावेश होता. सीआरपीएफच्या विशेष कोब्रा तुकड्यांना, राज्य पोलीस दलांसोबत, ब्लॅक फॉरेस्ट, ऑक्टोपस, डबल बुल आणि चक्रबंधा यांसारख्या मोहिमांमध्ये तैनात करण्यात आले होते, त्यामुळे पुन्हा मजबूत झालेले बालेकिल्ले उद्ध्वस्त करण्यास मदत झाली.



ही आकडेवारी त्या बदलाची कल्पना देते, प्रशासनाच्या माहितीनुसार २०१४ पासून डाव्या विचारसरणीच्या अतिरेक्यांनी प्रभावित भागांमध्ये ४०८ नवीन सुरक्षा शिबिरे आणि ५९७ अभेद्य पोलीस ठाणी स्थापन करण्यात आली आहेत. १२,००० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे रस्ते बांधण्यात आले आहेत, तर १,८०४ बँक शाखा, १,३२१ एटीएम आणि ६,०२५ पोस्ट ऑफिसची भर पडली आहे.

## नक्षलग्रस्त भागांमध्ये १७ हजार ५८९ कि.मी. लांबीचे रस्ते

**पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखालील सरकारने २०१४ पासून नक्षलग्रस्त भागांमध्ये १७,५८९ किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्यास मंजुरी देण्यात दिली आहे, त्यापैकी १२,००० किलोमीटर रस्त्यांचे बांधकाम यापूर्वीच पूर्ण झाले आहे. नक्षलवादाचे हळूहळू उच्चाटन होत असल्यामुळेच विकासकामे वेगाने पुढे सरकत आहेत. मोदी सरकारने ६,००० कोटी रुपये खर्च करून जवळपास ५,००० मोबाईल टॉवर्स उभारले आहेत. मोदी सरकारने आणखी दोन योजनांतर्गत ८,००० नवीन '4G' टॉवर्स उभारण्याचा निर्णयही घेतला आहे.**

## नक्षलग्रस्त भागात आता कायदा आणि संविधानाचे राज्य

■ यापूर्वी जेव्हा-जेव्हा बस्तरचे नाव घेतले जात असे, त्यावेळी तेथील हिंसाचाराचीच प्रतिमा डोळ्यासमोर उभी राहत असे.

■ नक्षलवाद्यांचा बंदोबस्त केल्यामुळे बस्तरसारख्या भागात विकासाची गंगा पोहचली आहे.

■ नक्षलवाद्यांच्या दहशतीतून बाहेर पडलेल्या बस्तरसारख्या भागातील नागरिकांचा आत्मविश्वास वाढू लागला आहे.

■ भारतातून नक्षलवादी आणि माओवाद्यांचा हिंसाचार संपूर्णपणे संपवला जाईल, ही मोदी सरकारची गॅरंटी आहे.

■ नक्षलवाद्यांच्या हिंसाचारामुळे देशातील मोठा भाग 'रेड कॉरिडॉर' म्हणून ओळखला जात असे. आता विविध सरकारी योजना पोहचल्यामुळे हा भाग विकासाचा 'ग्रीन कॉरिडॉर' बनू लागला आहे.

■ हिंसाचार करणाऱ्यांना, दहशतवाद्यांना दया-माया न दाखवता त्याच पद्धतीने उत्तर देणे ही नव्या भारताची ओळख बनली आहे.

■ नक्षलवाद्यांच्या हिंसाचारामुळे रक्ताने माखलेल्या भागामध्ये आता संविधान आणि कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले आहे.

■ नक्षलग्रस्त भागात आता तिरंगा मोठ्या अभिमानाने फडकवला जात आहे.

■ नक्षलवाद्यांच्या हिंसाचारामुळे या भागातील युवकांवर मोठा अन्याय झाला.

■ गेल्या काही वर्षात हजारो नक्षलवाद्यांनी शस्त्रे खाली ठेऊन आत्मसमर्पण केले आहे.

■ आत्मसमर्पण करणारे नक्षलवादी आता देशाच्या मुख्य प्रवाहात सहभागी झाले आहेत.



(पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नक्षलवाद्यांसंदर्भात केलेल्या वक्तव्यांचे संकलन)



## २५९ 'एकलव्य आदर्श निवासी शाळा' उभारल्या

मोदी सरकारने या भागात २५९ 'एकलव्य आदर्श निवासी शाळा' उभारल्या आहेत. यासोबतच, ४६ आयटीआय (ITIs), ४९ कौशल्य विकास केंद्रे आणि १६ कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. गेल्या १२ वर्षांत आम्ही या सर्व बाबींवर सुमारे ८०० कोटी रुपये खर्च केले आहेत. नागरी कार्यक्रमांतर्गत, आरोग्य शिबिरे आणि औषधोपचारांशी संबंधित २१२ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. आम्ही आदिवासी युवकांच्या आदानप्रदानासाठी (यूथ एक्सचेंज) विविध कार्यक्रमही सुरू केले आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने, आम्ही सुरक्षा-संबंधित खर्च योजना सुरू केली; या योजनेअंतर्गत गेल्या १० वर्षांत राज्यांना ३,००० कोटी रुपयांचा निधी पुरवण्यात आला आहे. आम्ही 'विशेष पायाभूत सुविधा योजना'ही आणली आणि त्याअंतर्गत ५,००० कोटी रुपयांची तरतूद केली.

प्रभावित भागांतील बहुतेक गावांमध्ये मोबाईल कनेक्टिव्हिटीचा विस्तार झाला आहे, त्याचबरोबर एकलव्य मॉडेल निवासी शाळा, आयटीआय आणि कौशल्य विकास केंद्रेही सुरू झाली आहेत. या भागांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी, ही केवळ विकासाची आकडेवारी नाही. रस्त्यामुळे बाजारपेठ किंवा रुग्णालयात जाण्याचा मार्ग मोकळा होतो. बँकेची शाखा कुटुंबांना औपचारिक वित्तपुरवठ्याशी जोडते. टेलिकॉम टॉवर एका दुर्गम गावाला देशाच्या उर्वरित भागाशी जोडतो. शाळा किंवा कौशल्य केंद्र तरुणांसाठी उपलब्ध असलेल्या पर्यायांचा विस्तार करतात. विविध संस्थांनी बंडखोरीला टिकवून ठेवणाऱ्या आर्थिक जाळ्यांना लक्ष्य केले आहे. चळवळीची कार्य



## नक्षलग्रस्त भागात बँक शाखांचे जाळे

**गेल्या १२ वर्षांत १,८०४ बँक शाखा उघडण्यात आल्या आहेत, १,३२१ एटीएम बसवण्यात आले आहेत, ३७,८५० 'बँकिंग कॉरेस्पॉन्डंट्स'ची (बँक प्रतिनिधींची) नियुक्ती करण्यात आली आहे आणि ६,०२५ टपाल कार्यालये सुरू करण्यात आली आहेत. हे सर्व केवळ १२ वर्षांच्या कालावधीत साध्य झाले आहे.**

करण्याची, स्वतःला वित्तपुरवठा करण्याची आणि आपल्या सदस्यांची संख्या पुन्हा वाढवण्याची क्षमता कमी करणे, हे यामागील धोरण राहिले आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नक्षलग्रस्त भागांशी वारंवार संपर्क साधणे हे या मोहिमेचे आणखी एक वैशिष्ट्य ठरले आहे. त्यांच्या बस्तर भेटी आणि प्रत्यक्ष जमिनीवर झालेल्या सुरक्षा आढावा बैठकांमुळे केंद्र सरकार या मोहिमेत जवळून गुंतले आहे. या मोहिमेसाठी दिल्ली, राज्य सरकारे आणि दुर्गम भागात तैनात असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये समन्वयाची आवश्यकता असते. राजकीय दिशा आणि विस्तारित सुरक्षा व विकास रचना यांचा मेळ घालण्याची सरकारची क्षमता या बदलाच्या केंद्रस्थानी राहिली आहे. पुढील टप्पा हा ज्या मोहिमा चर्चेत आल्या होत्या, त्यांच्याइतका नाट्यमय नसेल, पण या मोहिमेचा वारसा ठरवण्यासाठी तो अधिक महत्त्वाचा ठरू शकतो.

## आकर्षक पुनर्वसन धोरण

**मोदी सरकारने एक आकर्षक पुनर्वसन धोरण स्वीकारले आहे, ज्याअंतर्गत आत्मसमर्पण केल्यास ५०,००० रुपयांचे प्रोत्साहन दिले जाते; जर सामूहिक आत्मसमर्पण झाले, तर ही रक्कम दुप्पट केली जाते. सरकार या सर्वांना मोबाईल फोन पुरवते. शस्त्रे जमा केल्याबद्दल अतिरिक्त भरपाई दिली जाते. पुनर्वसन केंद्रांवर कौशल्य प्रशिक्षण आणि टूल किट्स (साधनांचे संच) पुरवले जातात. आम्ही त्यांना ३६ महिन्यांपर्यंत दरमहा १०,००० रुपये देतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सर्वांना 'प्रधानमंत्री आवास योजने'अंतर्गत घरे भेट दिली आहेत. एखादे गाव नक्षलमुक्त होऊन तिथे पंचायत स्थापन होताच, त्या गावाच्या विकासासाठी १ कोटी रुपये दिले जातात.**

पूर्वीचा रेड कॉरिडॉर तेव्हाच खऱ्या अर्थाने विकास कॉरिडॉर बनेल, जेव्हा या भागांमध्ये पोहोचणाऱ्या पायाभूत सुविधांमुळे शाश्वत आर्थिक उलाढाल, उत्तम शिक्षण आणि उर्वरित भारताशी अधिक एकीकरण निर्माण होऊ लागेल. बंदुका शांत होणे हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्यांनी मागे सोडलेल्या जागेत रस्ते, शाळा, व्यवसाय, उपजीविकेची साधने आणि कार्यरत संस्था उभ्या राहतील याची खात्री करणे, हे अधिक कठीण काम आहे. नक्षलवादाच्या अंताने हीच संधी निर्माण केली आहे. ■

# गडचिरोली बनते आहे 'विकास पंढरी'



● वेद कुमार

> हे सत्य होताना आपण लवकरच पाहणार आहोत. त्या दिशेने गडचिरोलीचा प्रवास वेगाने सुरू आहे. नक्षलवादाचा केंद्रबिंदू आता गुंतवणुकीचे केंद्र बनले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीला ग्लोबल मॅपवर आणण्यासाठी याआधीच ठोस पाऊले उचलली आहेत आणि त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत.

### गडचिरोली येथील प्रकल्पांची प्रगती

**जेएसडब्ल्यू** ग्रुपची जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया जवळपास पूर्णत्वाला आली आहे. चामोर्शी येथे MIDC सुमारे ३०००+ हेक्टर जमीन विकसित करण्याच्या प्रक्रियेत आहे. लोहखनिज ब्लॉकमध्ये शोधकार्य सुरू झाले आहे. खाण आणि कच्च्या मालाची उपलब्धता निश्चित केली जात आहे. पहिल्या टप्प्याचे लक्ष्य साधारण २०२९ आहे.**गुंतवणूक : १ लाख कोटी.**

लॉइड्स मेंटल्सच्या प्रकल्पाची लक्षणीय प्रगती झाली आहे. कोंसरी येथे स्लरी पाइपलाइन आणि प्रत्येकी ४ MTPA क्षमतेचे दोन पेलेट प्लांट कार्यरत आहेत! एकूण क्षमता ८ MTPA असून येथून निर्यातही केली जात आहे!! खाणकामाला वेग आला आहे. स्टील कॉम्प्लेक्सचे बांधकाम वेगाने सुरू असून वायर रॉड/TMT उत्पादन लवकरच अपेक्षित आहे. मुख्य स्टील प्रकल्पांसोबत इतर स्टील सुविधा विकसित करणे व विस्तार करण्याचे काम पुढे सुरू आहे. **गुंतवणूक : ४५००० कोटी + १५०००**




कोटी विस्तार.

सूरजगढ इस्पातच्या प्रकल्पाची २०२४ मध्ये पायाभरणी झाली. पहिल्या टप्प्यासाठी पर्यावरणीय मंजुरी आणि सार्वजनिक सुनावणी पूर्ण झाली आहे. विस्तारासाठी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे. पहिला टप्पा २०२६ मध्ये पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. **गुंतवणूक : २०००० कोटी**

सुपर स्मेलटर्स बरोबर २०२६ च्या सुरुवातीला २ MTPA क्षमतेच्या प्रकल्पासाठी सामंजस्य करार करण्यात आला. हा प्रकल्प अद्याप नियोजनाच्या टप्प्यात आहे. लोहखनिजाच्या उपलब्धतेची हमी मिळवण्याची प्रक्रिया येत्या काही आठवड्यात पूर्ण होईल. **गुंतवणूक : १०००० कोटी.**

(MTPA म्हणजे Million Tonnes Per Annum - अर्थात, वार्षिक दशलक्ष टन उत्पादन क्षमता.)

संजय गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी मिळून ९ वेळा अमेठीचे प्रतिनिधित्व करूनही एकही प्रकल्प अमेठीत आणला नाही. इकडे देवाभाऊंनी फक्त दीड वर्षात (पालकमंत्री असताना) एवढे प्रकल्प आणून ते मार्गी पण लावलेत. शाळा सुरू केल्या, एसटी सेवा सुरू केली, मोबाईल टॉवर्स उभे करून कार्यान्वित केले, १५ ऑगस्टला अनेक ठिकाणी तिरंगा डौलाने फडकत होता अशा अनेक सकारात्मक गोष्टींची जंत्रीच




आहे. पण त्याचबरोबर देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करणाऱ्या या मेगा-प्रकल्पांवर पण अथकपणे काम केले.

पशुपती ते तिरुपती पर्यंत पसरलेल्या रेड कॉरिडॉरमधून नक्षलवाद संपवण्यात आला असला, तरी या भागाला माओवाद्यांनी एवढी दशके देशाच्या मुख्य प्रवाहात येऊ दिले नव्हते. त्या भागांचा आता विकास करणे गरजेचे आहे, जेणेकरून मुख्यधारेपासून दूर ठेवण्यात आलेल्या या भागातील लोकांना खऱ्या अर्थाने आपलेसे करता येईल. गडचिरोलीत नक्षलवादाने पुन्हा कधीच डोके वर काढू नये म्हणून नक्षल-मुक्त गडचिरोलीत विकासाची गंगा नेऊन तिथे लवकरात लवकर आर्थिक सुबत्ता येणेही महत्वाचे होते. गडचिरोलीचा 'विकास' हा तिकडच्या माओवादाच्या ताबूतातील शेवटचा खिळा ठरणार, असा विश्वास आहे!

**जय हिंद!**

# डॉ. बाबासाहेब आंबडेकरांचे संविधान मोठे की काँग्रेस?

> ‘वंदे मातरम्’ या राष्ट्रगानाच्या पहिल्या दोन कडव्यांचे गायन करण्याबाबत काँग्रेस कार्यकारिणीने १९ ऑगस्ट २०२६ रोजी केलेल्या ठरावाचा भारतीय जनता पार्टी तीव्र निषेध करत आहे. ‘वंदे मातरम्’ हे भारताचे राष्ट्रीय गीत आहे. पवित्र भारतमातेला करावयाचे अभिवादन या गीतातून यथार्थपणे व्यक्त होते. इंग्रजांविरुद्धच्या स्वातंत्र्य चळवळीत याच ‘वंदे मातरम्’मुळे लाखो भारतीयांना लढण्याची प्रेरणा मिळाली. अशा या गीताची केवळ दोन कडवी गाण्याचा काँग्रेसचा निर्णय अत्यंत दुर्दैवी आहे, काँग्रेसच्या या निर्णयाचा निषेध करावा तितका कमीच आहे.

**काँग्रेसने** १९३७ मधील आपल्या निर्णयाचा हवाला देत हा ठराव केला आहे. काँग्रेसच्या या ठरावाच्या निमित्ताने ‘वंदे मातरम्’चा इतिहास आपण जाणून घेणे आवश्यक आहे. बंकीमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिलेले हे गीत भारतमातेची थोरवी वर्णन करणारे आहे. स्वातंत्र्य लढ्यात हे गीत राष्ट्रीय जागृतीचे प्रभावी साधन बनले. हे भारतमाते आम्ही तुला नमन करतो, असा ‘वंदे मातरम्’चा अर्थ आहे. १९०५ मध्ये इंग्रजांनी बंगालची फाळणी केल्यानंतर देशभर स्वदेशी आंदोलनाला गती मिळाली. या स्वदेशी आंदोलनात




‘वंदे मातरम्’हा ब्रिटीशांविरुद्ध प्राणपणाने लढण्याचा मंत्र बनला. संपूर्ण देशभर ‘वंदे मातरम्’चा निनाद ऐकू येऊ लागला. ‘वंदे मातरम्’मधील जनजागृतीची क्रांतिकारक शक्ती ब्रिटीशांनी ओळखली. त्यामुळे हे गीत भारतीयांनी गाऊ नये, अशा पद्धतीचे प्रयत्न ब्रिटीशांकडून झाले. १९०६ मध्ये ‘वंदे मातरम्’ सार्वजनिक ठिकाणी गाऊ नये, असा बंदी आदेश ब्रिटीशांनी काढला होता. मात्र भारतीयांच्या सामूहिक शक्तीपुढे ब्रिटीशांना नमते घ्यावे लागले. स्टुटगार्ट येथे श्रीमती भिकाजी कामा यांनी फडकवलेल्या ध्वजावर ‘वंदे मातरम्’ ही घोषणा लिहिली होती. त्यामुळे हे गीत स्वातंत्र्य चळवळीच्या सामूहिक चेतनेचा अविभाज्य भाग बनले. ब्रिटीशांच्या दडपशाहीविरोधात लढण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या या राष्ट्रीय गीताचा स्फूर्तीदायी इतिहास माहित असूनही काँग्रेस नेतृत्वाने ‘वंदे मातरम्’ची केवळ दोन कडवी गाण्याचा घेतलेला निर्णय निषेधार्ह आहे. काँग्रेसचा हा निर्णय जातीय दबावामुळे घेतला गेला आहे. ज्या ‘वंदे मातरम्’ गीतावर ब्रिटीशांनी बंदी घालण्याचे प्रयत्न केले त्याच गीताचा काँग्रेसकडून सांप्रदायिक तुष्टीकरणासाठी केवळ दोन कडवी गाण्याचा निर्णय घेऊन अपमान होत आहे. याच काँग्रेसने एकेकाळी ‘वंदे मातरम्’चे राष्ट्रीय महत्व मान्य केले होते. मात्र एका धर्माच्या दबावापोटी काँग्रेसने माघार घेतली. काकीनाडा येथे १९२३ मध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन भरले होते. त्या अधिवेशनात पंडित विष्णू

दिगंबर पलुस्कर यांनी 'वंदे मातरम्'चे गायन सुरू केले त्यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना मोहम्मद अली यांनी 'वंदे मातरम्'च्या गायनाचा आक्षेप घेतला आणि ते अधिवेशन स्थळावरून बाहेर पडले. या घटनेमुळे तत्कालिन काँग्रेस नेतृत्वाने २८ ऑक्टोबर १९३७ रोजी झालेल्या काँग्रेस कार्यसमितीच्या बैठकीत राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम्'च्या सहा कडव्यांपैकी पहली दोनच कडवी गायली जातील, असा ठराव समंत केला. पहिल्या दोन कडव्यानंतरच्या कडव्यांमधील धार्मिक संदर्भावर मुस्लिम नेत्यांकडून घेण्यात आलेले आक्षेप मान्य करत काँग्रेसने 'वंदे मातरम्'च्या संपूर्ण गायनावर मर्यादा आणली. काँग्रेसचा हा निर्णय त्यावेळच्या मुस्लिम तुष्टीकरणाच्या राजकारणाचा परिपाक होता. काँग्रेसच्या या निर्णयामुळे सांप्रदायिक आणि फुटीरतावादी राजकारणाला महत्व मिळाले. याचाच परिणाम मुस्लिम लीगने पुरस्कृत केलेल्या द्विराष्ट्र सिद्धांताला बळ मिळण्यात झाला. याच राजकारणाची परिणीती १९४७ मध्ये देशाची फाळणी होण्यात झाली. 'वंदे मातरम्'ची पहिली दोनच कडवी गाण्याच्या काँग्रेसच्या निर्णयामागील राजकीय पार्श्वभूमी मोहम्मद अली जिन्ना आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यात १९३८ मध्ये झालेल्या पत्र व्यवहारातून पुरेशी स्पष्ट होते. मुस्लिम लीगने त्यावेळच्या काँग्रेस नेतृत्वापुढे ६ मागण्या ठेवल्या होत्या, त्यातील एक मागणी 'वंदे मातरम्'चे गायन करू नये, अशा पद्धतीची होती. त्यावेळी पंडित नेहरू यांनी काँग्रेसच्या पहिली दोन कडवी गाण्याच्या काँग्रेस कार्यसमितीच्या निर्णयाचे समर्थन केले. काँग्रेस नेतृत्वाने नमते घेतल्यामुळे राष्ट्रीय गीतासारख्या मुद्यावरही सांप्रदायिक दबाबापुढे झुकण्याची परंपरा निर्माण झाली.

'वंदे मातरम्'ची किती कडवी गावीत यापुरता हा वाद मर्यादित नाही, असे भारतीय जनता पार्टीचे मत आहे. 'वंदे मातरम्' हे देशभक्तीचे आणि वसाहतवादी शक्तीविरोधातील संघर्षाचे स्फूर्ती स्थान आहे, असे भाजपाचे मत आहे. महात्मा गांधी एके ठिकाणी 'वंदे मातरम्'बद्दल काय म्हणाले आहेत ते पाहू... ''बंगालच्या फाळणी काळात ब्रिटीशांविरुद्ध लढताना हिंदू आणि मुस्लिमांचे प्रेरणास्त्रोत असलेले 'वंदे मातरम्' ब्रिटीश राजवटीला सहन होत नव्हते. कारण यातून ब्रिटीशांच्या वसाहतवादी राजवटीविरोधात आवाज व्यक्त होत होता. आनंद मठ कादंबरी आणि या कादंबरीचे लेखक बंकीमचंद्र यांच्याबद्दल मला काहीही माहिती नव्हते. मात्र 'वंदे मातरम्' पहिल्यांदा ऐकल्यावरच मी भारावून गेलो. आपल्या मातृभूमीविषयी जाज्वल्य निष्ठा प्रकट करणाऱ्या 'वंदे मातरम्'ची थोरवी अवर्णनीय आहे. यातील राष्ट्र भावनेशी मी पूर्णपणे सहमत आहे. हे गीत फक्त हिंदू धर्मियांपुरते मर्यादित आहे, असे मला कधीच वाटले नाही.दुर्दैवाने या गीताच्याबाबतीत आम्हाला काही अप्रिय गोष्टींना तोंड द्यावे लागत आहे.''



महात्मा गांधी यांनी व्यक्त केलेल्या भावना अत्यंत महत्वाच्या आहेत. 'वंदे मातरम्'चे ऐतिहासिक महत्व धार्मिक कल्पना शक्तीच्या दबावापुढे कमी लेखले जाऊ नये, असेच यातून दिसून येते. भारतीयांच्या प्रखर राष्ट्रभक्तीच्या भावना ब्रिटीशांपर्यंत पोहचवण्यासाठी 'वंदे मातरम्' हे प्रभावी माध्यम ठरले. २४ जानेवारी १९५० रोजी स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती आणि संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी 'वंदे मातरम्' हे भारताचे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले जाईल, अशी घोषणा केली. 'जन-गण-मन' प्रमाणेच 'वंदे मातरम्'लाही तसाच सन्मान आणि समान दर्जा दिला जाईल, असेही डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी स्पष्ट केले होते. त्यामुळे शासकीय



शिष्टाचारात 'जन-गण-मन' हे राष्ट्रगीत म्हणून गायले जाऊ लागले तर 'वंदे मातरम्' हे राष्ट्रीय गीत म्हणून शासकीय कार्यक्रमांमध्ये आणि अन्य कार्यक्रमांमध्येही कायम राहिले. मात्र त्यानंतरच्या काळात सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम्'ची पहिली दोन कडवीच गायली जाऊ लागली. उर्वरित चार कडवी म्हणणे हळूहळू बंद झाले. त्यामुळे नवीन पिढीसाठी 'वंदे मातरम्'ची नंतरची चार कडवी अपरिचितच राहिली. या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 'वंदे मातरम्'चा सन्मान अबाधित राखण्यासाठी 'वंदे मातरम्'ची सर्वच्या सर्व म्हणजे सहा कडवी गाण्याचा निर्णय घेतला. संसदेच्या २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात 'वंदे मातरम्'च्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. लोकसभेत ८ डिसेंबर २०२५ रोजी या विषयावर ११ तास ३२ मिनिटे तर राज्यसभेत १२ तास ४९ मिनिटे चर्चा झाली. सरकारने तेव्हापासून शासकीय शिष्टाचाराचा भाग म्हणून सर्व शासकीय कार्यक्रमांमध्ये संपूर्ण 'वंदे मातरम्' गाण्याचा निर्णय घेतला. यानुसार संसदेने अलिकडेच राष्ट्रीय सन्मान अवमान प्रतिबंधक (दुरुस्ती) विधेयक मंजूर केले आहे. या कायद्याद्वारे 'वंदे मातरम्'ला 'जन-गण-मन'प्रमाणेच संवैधानिक संरक्षण देण्यात आले आहे. 'वंदे मातरम्'चे गायन हेतूपूर्वक रोखणे तसेच 'वंदे मातरम्'चे गायन करणाऱ्या कार्यक्रमात जाणीवपूर्वक व्यत्यय आणणे हा दंडनीय अपराध ठरविण्यात आला आहे. मोदी सरकारची 'वंदे मातरम्'विषयीची अतीव आदराची भावना यातून प्रकट झाली आहे. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यानंतर प्रथमच लाल किल्ल्यावरील कार्यक्रमात संपूर्ण 'वंदे मातरम्' म्हणण्यात आले. एकीकडे मोदी सरकार 'वंदे मातरम्'च्या सन्मानार्थ पावले टाकत असताना दुसरीकडे काँग्रेसने आपली तुष्टीकरणाच्या राजकारणाची परंपरा कायम ठेवली आहे. स्वातंत्र्य दिनी काँग्रेसच्या कार्यालयात झालेल्या कार्यक्रमावेळी श्रीमती सोनिया गांधी या 'वंदे मातरम्'च्या दुसऱ्या कडव्यानंतरचे गायन थांबविण्याचा इशारा देत असल्याच्या चित्रफिती सर्वत्र प्रसारीत झाल्या. त्यानंतर चारच दिवसांनी म्हणजे १९ ऑगस्ट, २०२६ रोजी काँग्रेस कार्यसमितीने आपल्या १९३७ मधील ठरावाप्रमाणे 'वंदे मातरम्'ची पहिली दोन कडवी गाण्याचा ठराव संमत केला. काँग्रेसच्या कार्यक्रमांमध्ये संपूर्ण 'वंदे मातरम्' नव्हे तर पहिली दोन कडवीच गायली जातील, असे पक्ष नेतृत्वाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. यातून काँग्रेसची स्वातंत्र्य पूर्वकाळातील तुष्टीकरणाची मानसिकता अजूनही कायम असल्याचे दिसून आले आहे. एकेकाळी ज्या मानसिकेतून काँग्रेस नेतृत्वाने संपूर्ण 'वंदे मातरम्'ऐवजी दोनच कडवी गाण्याचा निर्णय घेतला तीच मानसिकता श्रीमती सोनिया आणि राहुल गांधी यांनी प्रकट केली आहे. ■

# 'वंदे मातरम्' च्या सन्मानाशी तडजोड नाही!

**काँग्रेसच्या** कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम्'चे गायन केवळ पहिल्या दोन कडव्यांपुरते मर्यादित ठेवण्याच्या काँग्रेस कार्यकारिणी समितीच्या निर्णयावरून भाजपने तीव्र आक्षेप घेतला आहे. २२ ऑगस्ट रोजी भाजपने या निर्णयाचा निषेध करणारा ठराव मंजूर केला. काँग्रेस कार्यकारिणी समितीने १९ ऑगस्ट २०२६ रोजी घेतलेल्या निर्णयात १९३७ मधील ठरावाचा पुनरुच्चार करण्यात आल्याचे भाजपने म्हटले आहे. भाजपचे अध्यक्ष नितीन नवीन यांनी या निर्णयावर पक्षाची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, 'वंदे मातरम्'च्या संपूर्ण सहा कडव्यांना राष्ट्रीय चेतना आणि स्वातंत्र्यलढ्याच्या वारशाशी जोडले जाते. त्यामुळे त्याची प्रतिष्ठा, सन्मान आणि ऐतिहासिक वारसा अबाधित ठेवण्यासाठी पक्ष प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

'वंदे मातरम्'च्या गायनावर १९३७ मध्ये निर्बंध घालण्यामागील ऐतिहासिक परिस्थितीवरही भाजप देशभरात चर्चा घडवून आणणार असल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात मुस्लिम लीगचा आक्षेप आणि त्यानंतर निर्माण झालेल्या जातीयवादी तसेच फुटीरतावादी मागण्यांच्या राजकारणाचा उल्लेख केला जाईल, असे भाजपचे म्हणणे आहे. महात्मा गांधी यांनी 'वंदे मातरम्'ला दिलेल्या ऐतिहासिक महत्त्वाचाही भाजपकडून देशभर प्रचार केला जाणार आहे. गांधीजींनी या गीताला 'साम्राज्यवादी विरोधी घोषणा आणि 'शुद्धतम राष्ट्रीय भावना'शी जोडले असल्याचे नितीन नवीन यांनी सांगितले. या मुद्द्यावर भाजप आपल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून देशव्यापी जनजागृती मोहीम राबवणार आहे. विशेषतः तरुणांमध्ये 'वंदे मातरम्'चा इतिहास, त्याचा अर्थ, राष्ट्रीय महत्त्व आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदान पोहोचवण्याचा पक्षाचा प्रयत्न राहणार आहे. संपूर्ण सहा कडव्यांचे हे गीत आणि त्याच्याशी जोडलेला संघर्ष, त्याग व राष्ट्रीय जागृतीचा इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धारही भाजपने व्यक्त केला आहे. नितीन नवीन यांनी हा मुद्दा




कोणत्याही एका राजकीय पक्षापुरता मर्यादित नसून देशाच्या सन्मानाशी आणि स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या देशभक्तांच्या वारशाशी संबंधित असल्याचे म्हटले. त्यांच्या मते, १९४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा 'वंदे मातरम्'ने केली होती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली २०४७ मध्ये 'विकसित भारताची' घोषणा देखील 'वंदे मातरम्' असेल.

नितीन नवीन यांच्या मते, भाजप 'वंदे मातरम्'कडे भारतमातेप्रती आदर व्यक्त करणारे गीत, स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा आणि राष्ट्रीय भावनेचे प्रतीक म्हणून पाहतो. जातीय दबाव, राजकीय लांगुलचालन किंवा व्होट बँक राजकारणाच्या प्रभावाखाली त्याच्या सन्मानाशी कोणतीही तडजोड केली जाऊ नये, अशी पक्षाची भूमिका आहे. १९५० मध्ये संविधान सभेने घेतलेल्या निर्णयाचा तसेच २०२६ मध्ये संसदेने 'जन गण मन'च्या बरोबरीने 'वंदे मातरम्'ला दिलेल्या वैधानिक संरक्षणाचा दाखला देत भाजपने आपली भूमिका मांडली आहे. काँग्रेस कार्यकारिणी समितीचा कोणताही ठराव हा घटनात्मक संस्था किंवा संसदेने केलेल्या कायद्यापेक्षा वरचढ ठरू शकत नाही, असेही नितीन नवीन यांनी म्हटले आहे. ■

# 17 सप्टेंबरपासून देशभर सेवा संकल्प अभियान

## राष्ट्रीय सरचिटणीस खा. विनोद तावडे यांची माहिती

**पंतप्रधान** नरेंद्र मोदीजी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त तसेच त्यांच्या राज्यकर्ता पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान देशभर 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. या अभियानात भाजपाचे कार्यकर्ते देशभरातील १४ लाखांहून अधिक अंगणवाडी केंद्रांपर्यंत पोहोचून 'मातृ संवाद' कार्यक्रम आयोजित करतील आणि अंगणवाडी सेविकांचा सन्मान करतील. 'सेवा सेतू अभियाना'अंतर्गत १५ दिवस ब्लॉक स्तरावर शिबिरांचे आयोजन; आयुष्मान भारत आणि प्रधानमंत्री किसान सन्मान निधीसारख्या योजनांपासून वंचित राहिलेल्या पात्र लाभार्थ्यांना सरकारी कल्याणकारी योजनांशी जोडण्यात येणार आहे. 'सेवेत माझे योगदान' आणि 'राष्ट्रीय नवोन्मेष आव्हान'च्या माध्यमातून युवकांना सेवा, सर्जनशीलता आणि नवोन्मेषाच्या क्षेत्रात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार. श्री. तावडे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या सार्वजनिक जीवनातील सेवाभाव समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान देशभर 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत विविध सेवा कार्ये, लाभार्थ्यांना सरकारी योजनांशी जोडणारे कार्यक्रम तसेच युवकांना सेवा आणि नवोन्मेषाशी जोडणारे उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभर 'सेवा पंधरवडा' आयोजित केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्त्व सेवाभावाशी सदैव जोडलेले राहिले आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्या वाढदिवसानिमित्त पक्षाकडून विविध सेवाकार्ये आयोजित केली जात आहेत. यंदाचे वर्ष विशेष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती आणि येत्या ७ ऑक्टोबर रोजी त्यांच्या सार्वजनिक जीवनातील या महत्त्वपूर्ण टप्प्याला २५ वर्षे पूर्ण होत



आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने देशभर महिनाभराचे 'सेवा संकल्प अभियान' आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे.

'सेवा संकल्प अभियाना'दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सेवाभाव समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने विविध कार्यक्रम आयोजित केले जातील. या अभियानांतर्गत अंगणवाड्यांमध्ये कार्यरत माता–भगिनींचा सन्मान करण्यात येणार असून, त्यांच्यासोबत 'मातृ संवाद' कार्यक्रम आयोजित केले जातील. 'सेवेत माझे योगदान' या नावाने एक महत्त्वपूर्ण उपक्रमही आयोजित करण्यात येणार आहे. या माध्यमातून विशेषतः युवक आणि नागरिकांना अभियानादरम्यान करण्यात येणाऱ्या सेवाकार्यांचे व्हिडिओ किंवा रील्स तयार करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. 'सेवा सेतू अभियाना'च्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात सुरू करण्यात आलेल्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती केवळ योजनेतून वगळली गेल्यामुळे लाभापासून वंचित राहू नये, याची खात्री केली जाणार आहे. यासाठी संबंधित विभागांकडून ब्लॉक स्तरावर १५ दिवस शिबिरांचे आयोजन करण्यात येईल. आयुष्मान भारत किंवा प्रधानमंत्री किसान सन्मान निधीसारख्या योजनांमध्ये एखाद्या पात्र व्यक्तीचे नाव राहून गेले असल्यास, त्या व्यक्तीला या शिबिरांमध्ये जाऊन आवश्यक अर्ज भरता येईल आणि संबंधित योजनेत नोंदणी करता येईल. अशा प्रकारे 'सेवा सेतू अभियान' हे सरकारच्या योजना आणि त्यांचे प्रत्यक्ष लाभार्थी यांच्यातील प्रभावी दुवा म्हणून काम करेल. ■

# दिमागी नक्षलींचा नेता - राहुल गांधी




राजकारणातील प्रख्यात विचारवंत युवराज राहुल गांधी यांनी अलिकडेच पुण्यात एका इव्हेंटच्या निमित्ताने आपल्या अकलेचा मान्सून सेल लावला होता. 'छात्रों की गूंज' असे नाव असलेला हा कार्यक्रम मार्केटिंग पद्धतीने इव्हेंटच्या शैलीत सादर करण्यात आला. या कार्यक्रमामुळे भारतीय जनता पार्टी आणि नरेंद्र मोदी यांना कायम विरोध करणारी मंडळी हर्षवायू झाल्याप्रमाणे टाळ्या वाजवत आहेत. या मंडळींमध्ये काही ज्येष्ठ पत्रकार आहेत, विचारवंत, राजकीय विश्लेषकही आहेत. हे पत्रकार, विचारवंत पूर्वाश्रमीच्या समाजवादी विचारधारेतील आहेत.

**या** समाजवादी विचारधारेचा जनता दल नामक पक्ष १९९० च्या उत्तरार्धात पूर्णपणे संपून गेल्यानंतर या विचारधारेचे पत्रकार, विचारवंत हे भारतीय जनता पार्टीचे प्रखर विरोधक बनले. या समाजवाद्यांनी १९९५ पर्यंत काँग्रेसला कडवा विरोध केला होता. समाजवादी विचारधारेतील आदरणीय व्यक्तिमत्व असलेले डॉ.राम मनोहर लोहिया यांनी १९६० च्या दशकात बिगर काँग्रेसवादाचा सिद्धांत मांडला. काँग्रेसच्या विरोधात जनसंघ, साम्यवादी अशा सर्व विचारधारेतील पक्षांनी आपले वैचारिक मतभेद बाजूला ठेऊन एकत्र यावे, अशी डॉ. लोहिया यांची कल्पना होती. जनसंघाने आपल्या स्थापनेपासून राष्ट्रवादाच्या कडव्या विचारसरणीचा पुरस्कार केला होता. त्यामुळे समाजवादी आणि साम्यवादी विचारांच्या सर्व पक्षांचा जनसंघाला विरोध होता. डॉ. लोहिया यांनी हे मतभेद बाजूला ठेवत काँग्रेसच्या सर्व विरोधकांना एकत्र आणले.

१९६७ मध्ये उत्तर भारतात अनेक राज्यांमध्ये बिगर काँग्रेसवादाच्या संकल्पनेतून काँग्रेस विरोधकांची संयुक्त विधायक दल या नावाने (संविद) सरकारे स्थापन झाली. हा इतिहास समाजवादी विचारधारेतील अनेक पत्रकार विसरून गेले आहेत. समाजवाद्यांना स्वबळावर कधीच सत्ता मिळवता आली नाही. जनसंघाचा वारसा सांगणाऱ्या भारतीय जनता पार्टीला केंद्रात आणि अनेक राज्यांमध्ये




सत्ता मिळाल्यामुळे या समाजवादी मंडळींचा जळफळाट झाला आहे. हा जळफळाट राहुल गांधीसारख्या नेत्याला पाठिंबा देऊन व्यक्त होत आहे. तर मुद्दा होता राहुल गांधींच्या पुण्यातील कार्यक्रमाचा. या कार्यक्रमात युवराजांनी आपण समाजसुधारक, विचारवंत असल्याचा आव आणत उपस्थित महिला वर्गाला पितृसत्ताक पद्धती विरोधात बंड करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात युवराजाने आपली अक्कल पाजळताना काही मुलींना व्यासपीठावर बोलवून त्यांच्याशी संवाद साधला. या मुलींमध्ये एक मध्यमवयीन मुस्लिम महिलाही व्यासपीठावर उपस्थित होती. एकीकडे हिंदू धर्मातील पितृसत्ताक पद्धती विरोधात तरुणींना आवाहन करणारे युवराज आपल्याच व्यासपीठावर उपस्थित असलेल्या मुस्लिम महिलेला मात्र असा सल्ला देण्याचे धाडस करू शकले नाहीत. मुस्लिम धर्मियातील महिलांना हिजाब नामक वेष घालून आपला चेहरा समाजापासून लपविण्याची आज्ञा धर्मगुरुंनी दिलेली असते. या बुरखा पद्धतीचे पालन ९९ टक्के मुस्लिम महिला करतात. हिजाब हा मुस्लिम महिलांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध आणणारा आहे. मुस्लिम महिलांनी, तरुणींनी व्यक्तिस्वातंत्र्य जपावे आणि हिजाब घालणे सोडावे, असे सांगण्याची हिंमत युवराजामध्ये नव्हती. आपण काहीतरी क्रांतिक्रारक विचार मांडत आहोत, असे ढोंग करणाऱ्या युवराजाचा विचारवंताचा बुरखा व्यासपीठावरच फाटला होता. युवाराजांच्या घराण्याचा महिला स्वातंत्र्याचा इतिहास काढून पाहिला तर

## ढोंगी युवराज

**पुण्याच्या कार्यक्रमात युवराजाने स्त्रीला आदर देण्याची संस्कृती वगैरे वगैरे मोठ्या-मोठ्या बाता केल्या. या युवराजाचे स्त्री विषयक प्रेम, आदर हे सगळे ढोंग आहे, हे अलिकडेच एका कार्यक्रमात दिसले होते. मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणावर टीका करताना युवराजाने व्यासपीठावरच्या संदीप दीक्षित या नेत्याला मिठी मारली होती. त्यावर संदीप दीक्षित यांनी, 'मेलोनी समज के गले लगाया था क्या?', अशी अत्यंत अश्लील टिपणी काँग्रेसच्या कार्यक्रमात केली होती. त्यावर या युवराजाने खेद, खंत काहीच व्यक्त केली नव्हती. संदीप दीक्षित ने जाहीर कार्यक्रमात एका महिलेविषयी असभ्य उद्गार काढल्यावर राहुल गांधींनी त्यांना समज द्यायला हवी होती. मात्र राहुल गांधींना संदीप दीक्षितच्या शेरेबाजीचे काहीच वाईट वाटलेले दिसले नाही. यावरूनच या युवराजाला महिलांविषयी आदर वाटत नाही, हे दिसले होते.**

**कालबाह्य झालेल्या मनुस्मृतीचा दाखला देत राहुल गांधींनी हिंदू धर्मात कायम स्त्रियांना पारतंत्र्यात ठेवले गेले, अशी मुक्ताफळे उधळली. हिंदू धर्माबद्दल तरुणाईच्या मनात अपराधगंड निर्माण करणे हा 'दिमागी नक्षली' टोळीचा व्यापक कट आहे. त्यासाठी हिंदू देव-देवतांबद्दल हेतूपूर्वक आक्षेपार्ह बोलले जाते. हिंदुंच्या मनात आपली संस्कृती, रूढी परंपरा यांच्याबद्दल तिरस्कार निर्माण व्हावा, या हेतूने 'दिमागी नक्षली'टोळी सातत्याने वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्न करत असते. पितृसत्ताक पद्धती वगैरे शब्द वापरत आपण मोठा बुद्धिवादी, क्रांतिकारक विचार मांडत आहोत, असा आव युवराजांनी आणला होता.**

तो काळ्याकुट्ट अक्षराने लिहला गेला आहे, हे अनेकदा दिसून आले आहे. युवराजांच्या वडिलांनी म्हणजे राजीव गांधी यांनी पंतप्रधान असताना घटना दुरुस्ती करून मुस्लिम महिलांचा पोटगी मागण्याचा हक्क संपवून टाकला. १९८५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्यात मध्य प्रदेशातील शाहबानो या मुस्लिम महिलेला आपल्या पतीकडे पोटगी मागण्याचा अधिकार आहे, असा ऐतिहासिक निकाल दिला होता. या निकालाचे देशभरातील विचारवंतांनी, बुद्धिवंतांनी स्वागत केले होते. मात्र मुल्ला-मौलवींनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला मोठा विरोध करत देशभर मोर्चे काढले. मुस्लिमांच्या वैयक्तिक बाबीत हस्तक्षेप करण्याचा अधिकार न्यायालयाला नाही, असे म्हणत या मुल्ला-मौलवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानालाच विरोध केला होता. कट्टर मुस्लिमांनी केलेल्या विरोधामुळे राजीव गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल बदलण्यासाठी घटना दुरुस्ती केली. राजीव गांधींच्या या निर्णयाविरोधात त्यांच्या पक्षाचे खासदार आरिफ मोहम्मद खान यांनी एकट्याने आवाज उठवला आणि पक्षाचा राजीनामा दिला. राहुल गांधींच्या अकेलेचा आवाका पाहिला तर त्यांना आपल्या वडिलांनी काय केले होते याचा अर्थ कळण्याची शक्यता जवळपास नाही. हिंदू महिलांना पितृसत्ताक पद्धती झुगारून देण्याचे बोधामृत पाजणाऱ्या युवराजाला आपल्या व्यासपीठावर व्यक्तिस्वातंत्र्य नसलेली मुस्लिम महिला उपस्थित आहे,



याचा अर्थही कळला नव्हता.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मुस्लिम महिलांची पुरुषी अन्यायातून सुटका करण्यासाठी तिहेरी तलाक बंदी करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला युवराजाने आणि त्यांच्या मातोश्रींनी कडाडून विरोधच केला. तिहेरी तलाक पद्धतीमध्ये मुस्लिम महिलांचा शारीरिक आणि मानसिक छळ होतो. त्यांना 'हलाला'सारख्या अमानुष प्रथेला सामोरे जावे लागते. या छळातून मुक्तता करण्याची मागणी मुस्लिम महिला संघटनांनी अनेकदा केली होती. मोदी सरकारने ही मागणी मान्य केली. संरक्षण दलामध्ये महिलांना अधिकारपदे देण्याचा निर्णय मोदी सरकारनेच घेतला. ऑपरेशन सिंदूरची माहिती देण्यासाठी भारतीय लष्करातील वरिष्ठ पदावरील महिलांनीच पत्रकार परिषद घेतली. यात एक मुस्लिम महिलाही होती. आपले पणजोबा म्हणजे पंडित नेहरू, आजी इंदिरा गांधी, वडील राजीव गांधी पंतप्रधान असताना भारतीय महिलांना लष्करात अशी अधिकारपदे का दिली नव्हती, असा विचार राहुल गांधींच्या डोक्यात येणे शक्यच नाही. तेवढा त्यांच्या बुद्धिचा आवाकाच नाही. मोदी सरकारने पंतप्रधान आवास योजनेखाली घरे मिळणाऱ्या लाभार्थ्यांना मिळणारे घर महिलेच्या नावावर करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय पितृसत्ताक पद्धती विरोधातीलच आहे. अशा अनेक निर्णयातून भारतीय जनता पार्टीने आणि मोदी सरकारने महिला स्वातंत्र्याची आपली भूमिका अनेकदा स्पष्ट केली आहे. हा इतिहास ज्येष्ठ पत्रकार, विचारवंतांना संपूर्णपणे ठाऊक आहे, तरीही केवळ भारतीय जनता पार्टीला विरोध म्हणून युवाराजाच्या प्रत्येक वाक्याला टाळ्या पिटण्याचे काम ही मंडळी इमाने इतबारे करीत आहेत. ■

# सेवा संकल्प अभियान कार्यशाळा






सेवा संकल्प अभियान– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य व विकास रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, प्रदेश सरचिटणीस – आ. संजय कुटे, आ.माधवी नाईक, आ. योगेश सागर, आ. निरंजन डावखरे, सुनिल राणे, राजेश पांडे, मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे आदी.



# 'यूपीआय'चे श्रेय मोदी सरकारचेच

## केंद्रात सरकार असताना अर्थतज्ज्ञ मनमोहन सिंग, पी. चिदंबरम यांना यूपीआय का सुरु करता आले नाही?

● दयानंद नेने

> एखाद्या पत्रकाराला सरकारवर टीका करायची असेल, तर ती जरूर करावी. लोकशाहीत सत्तेवर प्रश्न विचारणे हा पत्रकारितेचा धर्मच आहे. पण एखाद्या देशाच्या अभूतपूर्व तंत्रज्ञानात्मक यशाचे श्रेय देतानाही राजकीय आकस आडवा आला, तर त्याला निष्पक्ष विश्लेषण म्हणायचे की वैचारिक भिकारीपणा?

**गिरीश** कुबेर यांच्या अलीकडील अग्रलेखातील यूपीआय संदर्भातील मांडणी वाचताना हाच प्रश्न पडतो. यूपीआय म्हणजे Unified Payments Interface. २५ ऑगस्ट २०१६ रोजी त्याची प्रत्यक्ष सुरुवात झाली. आता यूपीआय भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा बनला आहे. एका मोबाइलवरून काही सेकंदांत एका बँक खात्यातून दुसऱ्या खात्यात पैसे पाठवणे, क्यूआर कोडद्वारे व्यवहार करणे आणि तेही देशाच्या कानाकोपऱ्यात – हे आता आपल्याला इतके सहज वाटते की त्यामागची प्रचंड तांत्रिक आणि प्रशासकीय किमया आपण विसरतो. आणि याच ठिकाणी कुबेरांचा लेख वाचून प्रश्न पडतो – यूपीआयचे कौतुक करताना मोदी सरकारचे नाव घेणे एवढे जड का गेले? कुबेरांच्या मांडणीत यूपीआय ही भारताची अभिमानास्पद तंत्रज्ञानात्मक कामगिरी असल्याचे मान्य केले जाते. पण त्याचे श्रेय देताना ते आयआयटी, पंडित नेहरू, मनमोहन सिंग यांनी तंत्रज्ञानप्रेमी लोकांना दिलेले वातावरण अशा संदर्भांकडे वळतात.




म्हणजे यूपीआय तयार झाले कारण आयआयटी होते, आयआयटी कारण नेहरू होते आणि तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणारे मनमोहन सिंग होते!

मग एक साधा प्रश्न विचारूया. जर हे सर्व इतके निर्णायक होते, तर यूपीआय मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात का आले नाही? तसेच जेव्हा यूपीआयची संकल्पना संसदेत मांडण्यात आली तेव्हा मनमोहन सिंग मंत्रिमंडळातले प्रमुख मंत्री पी. चिदंबरम यांनी तिची थट्टा का उडवली होती? यूपीआयची कल्पना, तांत्रिक पायाभूत रचना, एनपीसीआय, बँकिंग नेटवर्क, मोबाइल क्रांती – या सगळ्याचा विकास अनेक वर्षांच्या प्रक्रियेतून झाला हे नक्की. त्यामुळे यूपीआय हे एका व्यक्तीचे किंवा एका सरकारचे एकट्याचे उत्पादन आहे असे म्हणणेही अचूक नाही. पण २०१६ नंतर त्याला देशव्यापी प्रमाणावर नेणे, बँका–फिनटेक कंपन्या–सरकार–नियामक यांचे अभूतपूर्व एकत्रीकरण करणे आणि डिजिटल व्यवहारांना जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवणे – या टप्प्याचे श्रेय मोदी सरकारला नाकारणेही तितकेच इतिहासाशी बेईमानी करणारे आहे.

### आयआयटी आधीही होत्या – पण मग मुद्दा काय?

कुबेरांच्या लेखातून आयआयटी आणि नेहरूंच्या योगदानाचा संदर्भ दिला जातो. निश्चितच आयआयटीसारख्या संस्थांनी भारताच्या तांत्रिक मनुष्यबळाच्या निर्मितीत मोठे योगदान दिले आहे. पण इतिहास तिथेच थांबत नाही. स्वातंत्र्यपूर्व भारतातही उच्च शिक्षण आणि अभियांत्रिकीच्या अनेक उत्कृष्ट संस्था होत्या –रूरकी येथील अभियांत्रिकी संस्था १८४७ पासून, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे १८५४ पासून, अभियांत्रिकी महाविद्यालय मद्रास (आताचे चेन्नई) १८५९ पासून, इंडियन इनिस्ट्यूट ऑफ इंजिनिअरिंग सायन्स ॲण्ड टेक्नोलॉजी शिवपूर (पश्चिम बंगाल)ची परंपरा १८५६ पासून, व्हीजेटीआय मुंबई १८८७ पासून आणि बनारस अभियांत्रिकी महाविद्यालयची परंपरा १९१९ पासून आहे. म्हणून भारताची वैज्ञानिक किंवा अभियांत्रिकी परंपरा पंडित नेहरूंनी शून्यातून निर्माण केली, असा इतिहासाचा अर्थ काढणे योग्य नाही. भारताच्या वैज्ञानिक प्रगतीत अनेक पिढ्यांचे योगदान आहे. नेहरूंचे योगदान मान्य करा; पण त्यासाठी त्यांच्यापूर्वी भारतात काहीच नव्हते, असे सांगण्याची गरज नाही आणि त्याच न्यायाने मोदींचे योगदान मान्य केले तर ते नेहरू किंवा मनमोहन सिंग यांचा अपमान ठरत नाही.

### यूपीआयची खरी कहाणी काय सांगते?

यूपीआय ही केवळ एक तांत्रिक कल्पना नाही. ती यशस्वी करण्यासाठी आवश्यक होते. मजबूत डिजिटल पायाभूत सुविधा, बँकिंग व्यवस्थेचे एकत्रीकरण, मोठ्या प्रमाणावर डिजिटल ओळख आणि मोबाइल कनेक्टिव्हिटी, नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि बँकांमधील समन्वय, रिअल–टाइम पेमेंटची विश्वासार्ह यंत्रणा, व्यापारी आणि ग्राहकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे देशव्यापी स्वीकार निर्माण करण्याची राजकीय इच्छाशक्ती. यातील शेवटचा टप्पा अत्यंत महत्त्वाचा आहे. तंत्रज्ञान तयार करणे आणि ते १४० कोटी लोकांच्या दैनंदिन व्यवहारात रुजवणे, या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. यूपीआय आज चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत, भाजीवाल्यापासून व्यावसायिक संस्थांपर्यंत आणि शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत पोहोचले आहे. जगातील इतर देश भारताच्या या डिजिटल पेमेंट मॉडेलमध्ये रस दाखवत आहेत. ही केवळ वैज्ञानिक कामगिरी नाही; ही एका प्रणालीच्या अंमलबजावणीची अभूतपूर्व कहाणी आहे आणि या प्रणालीच्या अंमलबजावणीचे श्रेय मोदी सरकारला न देणे म्हणजे राजकीय पूर्वग्रहाचा चष्मा डोळ्यांवर ठेवून आकडे पाहण्यासारखे आहे.

### आणि मग येतो तो सर्वात रंजक योगायोग!

२५ ऑगस्ट २०१६ – यूपीआयची सुरुवात. ८ नोव्हेंबर २०१६– नोटाबंदी. एक गोष्ट स्पष्ट आहे– भारताची डिजिटल पेमेंट व्यवस्था नोटाबंदीच्या काळात मोठ्या प्रमाणावर उपयोगी पडली आणि त्यानंतर तिचा विस्तार अभूतपूर्व वेगाने झाला. नोटाबंदीच्या निर्णयावर तुमचे मत काहीही असो. त्यावर हजारो प्रश्न विचारले जाऊ शकतात आणि विचारले गेलेही आहेत. पण यूपीआयच्या पुढील विस्ताराचे श्रेय नाकारण्यासाठी त्या काळातील वस्तुस्थिती पुसून टाकण्याची गरज नाही. कारण तंत्रज्ञानाला केवळ बुद्धिवादी वातावरण लागत नाही. तंत्रज्ञानाला धोरणात्मक निर्णयाचा पाठिंबा, त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा आणि राजकीय इच्छाशक्तीदेखील देखील लागते आणि याच बाबतीत मोदी सरकारचे योगदान नाकारता येणार नाही. यूपीआयच्या यशाचे श्रेय फक्त मोदी सरकारचे आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

मोदी सरकारने चांगले केले असे म्हणायचे नाही. म्हणून आयआयटी आठवायचे. नेहरू आठवायचे. मनमोहन सिंग आठवायचे. आणि मोदींचे नाव शक्य तितके टाळायचे! यालाच म्हणतात–श्रेय देतानाही राजकीय कंजूषपणा किंवा अधिक स्पष्ट भाषेत सांगायचे तर–वैचारिक भिकारीपणा! मोदींच्या प्रत्येक निर्णयाचे समर्थन करणे ही पत्रकाराची जबाबदारी नाही. पण मोदी सरकारने केलेल्या चांगल्या कामाचे श्रेय देणेही पत्रकाराच्या वैचारिक प्रतिष्ठेला कमी करणारे नाही.

गिरीश कुबेरांनी यूपीआयचे कौतुक केले–त्याबद्दल आनंदच आहे. पण भारताने जगाला दिलेल्या या डिजिटल क्रांतीचे श्रेय देताना मोदी सरकारचे नाव घेण्याइतकी उदारता दाखवली असती, तर त्यांच्या अग्रलेखाची उंची नक्कीच वाढली असती. मोदींना श्रेय दिल्याने नेहरू छोटे होत नाहीत. मोदींचे श्रेय नाकारल्याने नेहरू मोठे होत नाहीत. इतिहास मात्र विकृत होतो!

# ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी ऊर्जा देणारी 'गोबरधन योजना'

> ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी ऊर्जा देणारी गोबरधन योजना भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था शेती आणि पशुधनाभोवती मोठ्या प्रमाणावर फिरते. मात्र शेतीतील अवशेष, जनावरांचे शेण, स्वयंपाकघरातील ओला कचरा, बाजारपेठांमधून निर्माण होणारा जैविक कचरा यांचे योग्य व्यवस्थापन हा ग्रामीण भागासमोरील महत्त्वाचा प्रश्न आहे.

### गावांच्या स्वच्छतेला मोठी चालना

ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न वेगळ्या पद्धतीने पाहण्याची गरज आहे. शहरांप्रमाणे प्रत्येक गावात मोठ्या प्रमाणावर कचरा संकलन आणि प्रक्रिया व्यवस्था असणे शक्य नसते. अशा परिस्थितीत स्थानिक पातळीवर जैविक कचऱ्याचे मूल्यवर्धन करणे अधिक व्यवहार्य ठरते.

गोठ्यातील शेण, घरातील ओला कचरा आणि शेतीतील अवशेष यांची योग्य विल्हेवाट लावली तर गावातील घाण कमी होऊ शकते. त्यामुळे दुर्गंधी, माशा-मच्छर आणि प्रदूषण कमी करण्यास मदत होते. म्हणूनच गोबरधन ही स्वच्छ भारत अभियानाच्या ग्रामीण कचरा व्यवस्थापनाच्या उद्दिष्टाशी जोडलेली आर्थिक योजना देखील आहे.

### ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्व

भारताची ऊर्जा गरज सातत्याने वाढत आहे. अशावेळी स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या जैविक संसाधनांपासून इंधन तयार करणे महत्त्वाचे ठरते. CBG




हे नैसर्गिक वायूला पर्याय म्हणून वापरता येणारे इंधन आहे. त्यामुळे शेण आणि जैविक कचऱ्याचे CBGमध्ये रूपांतर झाले तर ग्रामीण भागातील कचरा थेट ऊर्जा क्षेत्राशी जोडला जातो. GOBARdhanच्या माध्यमातून CBG क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने विविध धोरणात्मक उपाय केले आहेत. CBGbm carbon credit tradingशी जोडण्यासारखे उपायही करण्यात आले आहेत. यामुळे CBG प्रकल्पांना अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत निर्माण होऊ शकतो. सीएनजी हे जमिनीखालून मिळणारे जीवाश्म इंधन. त्याच्या साठ्यांवर मर्यादा आहेत. तर कॉम्प्रेस्ड बायोगास हा सर्व प्रकारच्या सेंद्रिय व जैव कचऱ्यापासून तयार होणार आहे. रासायनिक गुणधर्म तेच असल्याने कॉम्प्रेस्ड बायोगासचा वापट वाहनांसाठी एक पर्यायी, अक्षय्य इंधन म्हणून केला जाऊ शकतो. म्हणूनच त्याला बायो सीएनजी म्हणतात.

### रोजगारनिर्मितीची मोठी क्षमता

गोबरधन योजनेचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे ग्रामीण रोजगार. बायोगॅस किंवा CBG प्रकल्प उभारण्यासाठी केवळ प्लांट पुरेसा नसतो. त्यासाठी जैविक कचरा संकलन, वाहतूक, कचऱ्याचे वर्गीकरण, प्लांट ऑपरेशन, देखभाल, बायोगॅस/CBG वितरण, सेंद्रिय खताचे उत्पादन, खताची विक्री, तांत्रिक सेवा अशा अनेक स्तरांवर मनुष्यबळाची आवश्यकता असते. त्यामुळे GOBARdhan ग्रामीण भागात स्थानिक रोजगाराचे नवीन मॉडेल निर्माण करू शकतो. विशेषतः स्वयं-

सहायता गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, ग्रामपंचायती आणि ग्रामीण उद्योजकांना यात मोठी भूमिका मिळू शकते.

### महिलांसाठीही संधी

ग्रामीण भागातील महिलांचा जैविक कचरा व्यवस्थापनाशी प्रत्यक्ष संबंध असतो. स्वयंपाकघरातील ओला कचरा, पशुधन आणि घरगुती इंधन व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये महिलांची भूमिका महत्त्वाची आहे. गावपातळीवर महिला बचतगटांना कचरा संकलन, जैविक खत निर्मिती, खताची विक्री आणि बायोगॅस प्रकल्पांच्या व्यवस्थापनात सहभागी करून घेतले तर GOBARdhan हा महिला आर्थिक सक्षमीकरणाचा कार्यक्रमही बनू शकतो.

### पर्यावरणाच्या दृष्टीने मोठा फायदा

जैविक कचरा उघड्यावर कुजत राहिल्यास पर्यावरणावर परिणाम होतो. शेतीतील अवशेष जाळण्यामुळे वायू प्रदूषण वाढते. दुसरीकडे जैविक कचऱ्यापासून ऊर्जा निर्माण केली तर कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छ ऊर्जा हे दोन्ही उद्देश एकाच वेळी साध्य करता येतात. यामुळे GOBRdhan हा Circular Economyच्या संकल्पनेशी जोडला जातो. म्हणजेच उत्पादन प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या अवशेषांना पुन्हा अर्थव्यवस्थेच्या चक्रात आणणे. शेण आणि कचरा संपवायचा नाही; त्याचे मूल्यवर्धन करायचे, हा या योजनेचा मूलभूत विचार आहे.

### सेंद्रिय शेती आणि मातीच्या आरोग्यासाठी फायदा

रासायनिक खतांचा अतिरेक हा शेतीसमोरील गंभीर प्रश्न आहे. मातीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवणे, मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता सुधारणे आणि जमिनीची सुपीकता टिकवणे यासाठी सेंद्रिय पदार्थांचे महत्त्व मोठे आहे. GOBARdhanमधून निर्माण होणाऱ्या बायो-स्लरी आणि सेंद्रिय खताचा योग्य वापर केल्यास मातीच्या आरोग्याला फायदा होऊ शकतो. सरकारनेही ICAR माध्यमातून विविध पिकांमध्ये बायो-स्लरी आणि FOM/LFOMच्या वापराबाबत मार्गदर्शक माहिती विकसित केली आहे. त्यामुळे गोबरधनचा अंतिम परिणाम फक्त गॅस निर्मितीपुरता मर्यादित नसून मातीचे आरोग्य आणि दीर्घकालीन कृषी उत्पादकता यांच्याशीही संबंधित आहे.

**(समाप्त)**

---

# युवा पिढीला नशामुक्त करण्यासाठी प्रयत्न करू या

**युवा** पिढीला व्यसनाधीनतेच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी 'थ्री-टी' (Trace, Treat, Transform) या सूत्राचा वापर करावा लागेल:

१. कडक कायदेशीर अंमलबजावणी (Trace Crackdown)

**अँटी-ड्रग्ज स्कॉडची बळकटी:** शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या ५०० मीटर परिसरात अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर मोक्का अंतर्गत कडक कारवाई करणे.

**डार्क वेब आणि कुरिअरवर पाळत:** आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अंमली पदार्थांच्या ऑनलाईन पुरवठा साखळीचा शोध घेणे.

**मोफत समुपदेशन केंद्र:** प्रत्येक जिल्ह्यात सरकारी रुग्णालयांमध्ये सुसज्ज आणि मोफत व्यसनमुक्ती व समुपदेशन केंद्रे सुरू करणे.

**हेल्पलाईन क्रमांक:** युवकांसाठी २४/७ कार्यरत असणारी एक गोपनीय हेल्पलाईन सुरू करणे, जिथे ते भीतीशिवाय मदत मागू शकतील.

**क्रीडा आणि संस्कृतीला प्राधान्य:** ग्रामीण व शहरी भागात 'खेळो इंडिया'च्या धर्तीवर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे, जेणेकरून युवकांची ऊर्जा सकारात्मक कामात खर्च होईल.

**अभ्यासक्रमात समावेश:** शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम सांगणारे विशेष सत्र अनिवार्य करणे.

**पालक-शिक्षक संवाद:** मुलांच्या बदलत्या सवयींवर लक्ष ठेवण्यासाठी शाळांमध्ये नियमित पालक-शिक्षक बैठकांमध्ये या विषयावर चर्चा घडवून आणणे.

**- डॉ स्वप्नील बी मंत्री**
**मुख्य प्रदेश समन्वयक,**
**भाजपा वैद्यकीय प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेश**








मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दक्षिण-पश्चिम नागपूर भाजपा जनसंपर्क कार्यालयाला भेट देऊन कार्यालयात सुरू असलेल्या विविध उपक्रमांची पाहणी करत माहिती जाणून घेतली. 'देवाभाऊ रजक समृद्धी योजने'अंतर्गत उद्योग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष प्रमोद वाकोडकर यांच्या माध्यमातून दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघातील व्यावसायिकांना वितरित करण्यात येत असलेल्या ऑटोमॅटिक स्टीम आयर्न टेबलची पाहणी केली.

# महाराष्ट्रातून अमली पदार्थांचे २०२९ पर्यंत समूळ उच्चाटन

## नशामुक्त भारत अभियानात पुढचे पाऊल, सर्वसमावेशक धोरण

**नशामुक्त** भारत अभियानात महाराष्ट्र राज्याने पुढचे पाऊल टाकले आहे. २०२९ पर्यंत राज्यातून अमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तयार करण्यात आलेले सर्वसमावेशक धोरण मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. व्यापक जनजागृती आणि अमली पदार्थांच्या विरोधात कठोर कारवाई असे हे धोरण असेल. यात शासनाच्या सर्वच विभागांचा सहभाग घेतला जाणार आहे. हे सर्वसमावेशक धोरण यशस्वी व्हावे यासाठी ग्राम पातळीपासून ते जिल्हा, विभाग आणि मंत्रालयीन स्तरापर्यंत जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे. नशामुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी विविध विभागांच्या सहकार्याने अशाप्रकारे सर्वसमावेशक अभियान राबवणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे.

केंद्र शासनाने विविध केंद्रीय व राज्य शासनाच्या विभागांमध्ये समन्वय साधून २०२९ पर्यंत संपूर्ण देशातून अमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय पातळीवर 'नशामुक्त भारत अभियान' प्रभावीपणे राबविले जात आहे. केंद्र शासनाच्या या धोरणाला गती देण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्याला सन २०२९ पर्यंत पूर्णपणे अमली पदार्थमुक्त करण्यासाठी 'सर्वसमावेशक शासकीय दृष्टिकोन' असे धोरण तयार करण्यात आले आहे. याअंतर्गत राज्यातील अवैध अमली पदार्थांच्या निर्मितीला कारणीभूत असणारी पिकांची शेती, लागवड, नैसर्गिक व सिंथेटिक अमली पदार्थांचे उत्पादन – वाहतूक, विक्री व सेवनावर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच याबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व विभागांना 'अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (एएनटीएफ)' यांच्याशी समन्वय साधून काम करावे लागणार आहे. यासाठी मंत्रालय स्तरावरून समन्वयासाठी प्रत्येक विभागाकडून उपसचिव दर्जाचा अधिकारी नोडल अधिकारी नियुक्त केला जाणार आहे.

या धोरणाच्या अंलबजावणीसाठी विविध विभागांना कार्यवाहीचे मुद्दे– ॲक्शन प्लॅन निश्चित करण्यात आला आहे. यात शालेय शिक्षणात पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०२७) इयत्ता पाचवीपासून अंमली पदार्थाबाबत जनजागृतीबाबत किमान एक धडा समाविष्ट करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा – ३ मध्ये अमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी वाढीव गुण दिले जाणार आहेत. सर्व शैक्षणिक संस्थांचा परिसर ड्रग फ्री कॅम्पस ठेवण्याकरिता उच्च व तंत्रशिक्षण विभागाला कार्यवाही करावी लागणार आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियानातही वाढीव गुण दिले जाणार आहेत. याशिवाय दरवर्षी २६ जून रोजी अमली पदार्थमुक्त उत्कृष्ट जिल्हा म्हणून पुरस्कार घोषित केले जातील. यात त्या–त्या जिल्ह्याची २ ऑक्टोबर ते ३० एप्रिल कालावधीतील या कामगिरीचे मूल्यमापन केले जाईल.

या धोरणात अमली पदार्थ नियंत्रणाकरीता प्रभावी अमलबजावणी, अमली पदार्थ पुरवठ्यात तीव्र घट करणे, अमली पदार्थांच्या मागणीत प्रभावी घट करणे, व्यसनमुक्ती, उपचार व पुनर्वसन असे चार स्तंभ निश्चित करण्यात आले आहेत. अमली पदार्थ नियंत्रणाकरिता प्रभावी अमलबजावणीची जबाबदारी गृह, परिवहन, बंदरे, विधि व न्याय या विभागांवर असेल. अमली पदार्थांच्या पुरवठ्यास आळा घालण्याची जबाबदारी महसूल, कृषि, वन विभाग यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तर कृत्रिमरित्या निर्माण करण्यात येणाऱ्या अवैध अंमली पदार्थांबाबत अन्न व औषध प्रशासन विभाग, उद्योग विभाग यांना कारवाई करावी लागणार आहे. ■

# कुकडी प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी रुपयांची तरतूद

## पुणे, अहिल्यानगरसह सोलापूर जिल्ह्यातील १ लाख ४४ हजार ९१२ हेक्टरला सिंचन



**पुणे** जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या कामासाठी चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानुसार या प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या तरतुदीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागातील सिंचन सुविधांना बळकटी मिळणार आहे. कुकडी पाटबंधारे प्रकल्प येडगाव, माणिकडोह, वडज, डिंभे आणि पिंपळगाव जोगे या पाच धरणांचा संयुक्त प्रकल्प आहे. या पाच धरणांची एकूण उपयुक्त पाणीसाठा क्षमता ३०.५२ टीएमसी असून प्रकल्पाचा पाणीवापर ३९.३६ टीएमसी इतका आहे. प्रकल्पामुळे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर व शिरूर, अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा व कर्जत तसेच सोलापूर जिल्ह्यातील करमाळा या सात टंचाईग्रस्त तालुक्यांतील एकूण १ लाख ४४ हजार ९१२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

दरसूचीतील वाढ, जादा दराच्या निविदांची स्वीकृती, भूसंपादनाच्या खर्चातील वाढ, विशेषतः नवीन भूसंपादन कायद्यामुळे झालेली वाढ, संकल्पचित्रातील बदल, नवीन अथवा वगळलेल्या तरतुदी, अपुऱ्या तरतुदी तसेच अन्य अनुषंगिक खर्चामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. त्यानुसार राज्यस्तरीय तांत्रिक समितीने प्रस्तावाची छाननी केल्यानंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने हा चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर केला होता. बांधकामविषयक उच्चाधिकार समितीनेही प्रस्तावाची छाननी केल्यानंतर ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेस मान्यता देण्याची शिफारस केली होती.

मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमध्ये प्रत्यक्ष कामासाठी ४ हजार ९४६ कोटी २० लाख रुपये, तर अनुषंगिक खर्चासाठी ७५८ कोटी ३० लाख रुपयांचा समावेश असेल. प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत आणि सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रकल्पाची किंमत कमी करण्याच्या दृष्टीने उर्वरित भूसंपादनासाठी केवळ आवश्यक क्षेत्राचेच भूसंपादन करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालातील सर्व मुद्द्यांची पूर्तता करणे तसेच मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरित अथवा अतिरिक्त खर्च न करण्याची जबाबदारी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळावर सोपविण्यात आली आहे. ■

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई–२०
दूरध्वनी : ०२२–२२०२२०५०, फॅक्स : ०२२–२२८५२३०५
ई मेल– bjpmaha.manogat@gmail.com